cmyk

## संपादकीय

### राज्यसभेचे मैदान कोण मारणार

राज्यसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. एप्रिलला या निवडणुका होत असून राज्यातून सात खासदार नव्याने राज्यसभेवर जाणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदास आठवले, रायगड मधील पेणचे धैर्यशील पाटील, शिवसेनेच्या प्रियंका चतुर्वेदी, रजनी पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फौजीया खान हे सात सदस्य दोन एप्रिल २०२६ रोजी राज्यसभेतून निवृत्त होत आहेत.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३०२ | शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# राज्यातील साखर कारखाने अडचणीत

## ऊस शेतकऱ्यांचे 'एफआरपी'चे पैसे थकून इस्माचे बल्लानी यांची माहिती



पुणे । प्रतिनिधी

साखरेच्या उत्पादन खर्चापेक्षा विक्रीची किंमत १० टक्क्यांनी कमी आणि त्यातच सरकारकडून इथेनॉलची खरेदीही कमी झाल्याने साखर कारखानदार अडचणीत आले आहेत. महाराष्ट्रातील कारखानदारांकडून शेतक–यांचे उसाच्या रास्त आणि किफायशीर किमतीचे (एफआरपी) साडेचार हजार कोटी रुपये थकीत असून कारखाने संकटातून बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) वाढविण्याची गरज आहे अशी भूमिका इंडियन शुगर अँड बायो–एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे (इस्मा) ▶▶ पान २ वर

**साखर उद्योगाची स्थिती**

साखरेचा उत्पादन खर्च : ४१.७ रुपये प्रतिकिलो, साखरेची विक्री किंमत : ३७ रुपये प्रतिकिलो, ऊसाची एफआरपी : ३५५ रुपये प्रतिक्विंटल, साखरेची एमएसपी : ३१ रुपये प्रतिकिलो

### इथेनॉल खरेदीही कमी

'साखरेपासून इथेनॉल निर्मितीसाठी कारखादानरांनी प्रकल्प उभारले. त्यासाठी त्यांनी मोठे भांडवल गुंतविले. मात्र, इथेनॉलची सरकारी तेल कंपन्यांकडून खरेदी कमी असल्याने उत्पादनावर मर्यादा येत आहेत. साखर उद्योगाची इथेनॉल निर्मिती क्षमता २८८ कोटी लिटर आहे. प्रत्यक्षात ८७ लाख कोटी लिटर इथेनॉलची खरेदी झाली आहे. त्यामुळे निम्म्याहून कमी क्षमतेने इथेनॉलचे उत्पादन करावे लागत आहे. इथेनॉलचे उत्पादन कमी केल्याने त्यासाठीचा साखरेची कोटा कमी होऊन बाजारात जास्त साखर आणावी लागत आहे. त्यामुळे अतिरिक्त साठा होऊन साखरेचे दर कमी होत आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने इथेनॉलचा कोटा वाढवावा,' अशी मागणी दीपक बल्लानी यांनी केली.

### निर्यातही परवडेना

देशातून साखर निर्यातीचा कोटा या हंगामात २० लाख टन आहे. आतापर्यंत ४ लाख टन साखरेची निर्यात झाली असून, आणखी ३ लाख टन साखरेची निर्यात अपेक्षित आहे. त्यामुळे या हंगामात साखरेची एकूण निर्यात ७ लाख टनांवर जाईल. साखरेची निर्यात कमी होण्यामागे आंतरराष्ट्रीय पातळीवर कमी झालेले दर कारणीभूत आहेत. लंडनमध्ये साखर निर्यात केल्यास सध्या प्रतिटन ३४ हजार ५०० रुपये दर मिळत आहे. त्याच वेळी देशांतर्गत बाजारपेठेत साखरेला प्रतिटन ३७ हजार रुपये दर मिळत आहे. त्यामुळे कारखान्यांना साखर निर्यात परवडत नसल्याचे चित्र आहे.

# मंत्र्यांनी बोलवल्या बैठकीला गैरहजेरी

## बीडचे तात्कालीन जिल्हाधिकारी एमडी सिंग निलंबित

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने सध्या मुंबईत आमदार आणि मंत्रीमहोदयांची रेलचेल पाहायला मिळत आहेत. तर, मंत्रिमहोदयांकडून जिल्हाधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन अनेक कामे मार्गी लावण्याचंही काम केलं जातंय. पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनीही वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. मात्र, पंकजा मुंडेंच्या आदेशानंतरही आयएएस अधिकारी एम. देवेंद्र सिंग हे ब्रीफिंगसाठी न आल्याने अखेर त्यांचं निलंबन करण्यात आलं आहे. याप्रकरणी, तालिका अध्यक्ष दिलीप लांडे यांनी निलंबनाचे आदेश दिले होते. त्यानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडून त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली.

### बीडमध्ये ही उडाले होते खटके

बीडच्या तात्कालीन पालकमंत्री पंकजा मुंडे असताना त्याकाळी बीडचे जिल्हाधिकारी म्हणून एमडी सिंग हे कार्यरत होते अनेक कार्यकर्त्यांच्या त्यांच्याविषयी तक्रारी होत्या एमडी सिंग हे शिस्तीचे अधिकारी होते चुकीचे काम न करण्याचा त्यांचा पायंडा असल्याने दरम्यानच्या काळात मुंडे समर्थक कार्यकर्ते आणि जिल्हाधिकारी एमडी सिंग यांच्यात खटके उडाले होते

विधानसभेतील चर्चेदरम्यान मंत्री पंकजा मुंडे यांच्या ब्रीफिंगसाठी बोलाविण्यात आल्यानंतरही ▶▶ पान २ वर

# महादेव मुंडे हत्याप्रकरण, नार्को टेस्टचा अहवाल एसआयटीकडे

बीड । प्रतिनिधी

**परळीतील व्यापारी महादेव मुंडे हत्या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. नार्को टेस्टचा रिपोर्ट एसआयटीच्या हाती आला आहे. ब्रेन मॅपिंग आणि नार्कोटेस्ट रिपोर्ट मधून महादेव मुंडे हत्या प्रकरणाचं सत्य बाहेर येणार आहे. नार्को टेस्टच्या अहवालातून हत्येचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. न्यायालयाच्या समोरच नार्को टेस्टचा रिपोर्ट उघडला जाणार आहे. नार्को टेस्टच्या अहवालामध्ये नेमकी काय माहिती याकडे लागले सर्वांचे लक्ष लागलं आहे.**



२० ऑक्टोबर २०२३ रोजी परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांचापरळीतील तहसील कार्यालयासमोर निर्घुणपणे खून करण्यात आला. या प्रकरणी मुंडे कुटुंब आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनी केलेल्या दाव्यानुसार, महादेव मुंडेंची हत्या केवळ १२ गुंठे जमिनीच्या किरकोळ कारणावरून झाली आहे. यात वाल्मिक कराड आणि त्याच्या मुलाचा हात असल्याचा आरोप आहे. काही दिवसांपूर्वी ▶▶ पान २ वर

# वाल्मिक कराडच्या मुलाची पोष्टने खळबळ

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणाला जवळपास दीड वर्षे पूर्ण होत आले असून खटला सुरू आहे. दुसीरकडे सर्वोच्च न्यायालयातही वाल्मिक कराडचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे. वाल्मिकने सातत्याने जामीनासाठी अर्ज केला होता. मात्र, आधी सत्र न्यायालय, पुन्हा उच्च न्यायालय आणि आता सर्वोच्च न्यायालयाने देखील वाल्मिकचा जामीन फेटाळला. त्यानंतर, वाल्मिकच्या मुलाने फेसबुक पोस्ट केलीय. ▶▶ पान २ वर

# मद्य घोटाळ्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

## कोर्टाच्या निकालानंतर केजरीवाल ढसाढसा रडले



नवी दिल्ली । वृतसंस्था

दिल्लीतील कथित मद्य घोटाळ्याच्या आरोपातून राऊज एवेन्यू कोर्टाने माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह २२ आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या घोटाळ्याच्या आरोपात अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, विजय नायर यांच्यासह इतरांवर गंभीर आरोप झाले होते. ▶▶ पान २ वर

### पंतप्रधानांना शोभत नाही

२४ तास राजकारण करणे, खोटे आरोप करून विरोधकांना अडकवणे, त्यांना जेलमध्ये टाकणे हे पंतप्रधानांना शोभत नाही. त्यातून देश पुढे जाणार नाही. देशातील जनतेचे प्रश्न सुटले तर देश पुढे जाईल असेही केजरीवाल यांनी म्हटले आहे. मोदी शहा यांनी देशाची माफी मागावी असे केसरीवाल म्हणाले

# एक मार्चपासून अवैध प्रवासी वाहतूक विरोधात राज्यभर मोहीम

मुंबई । प्रतिनिधी

राज्यभरात वाढत चाललेल्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून कायदेशीर वाहतूक व्यवस्थेलाही मोठा फटका बसत आहे. परवाना, फिटनेस प्रमाणपत्र, विमा किंवा नियमानुसार परवानगी नसताना प्रवासी ने–आण करणा–या वाहनांमुळे अपघातांचा धोका वाढत असून प्रवाशांचे जीव धोक्यात येत आहेत. अशा अवैध प्रवासी वाहतूकीवर निर्बंध आणावेत त्यासाठी १ मार्चपासून राज्यभर प्रभावी मोहीम राबवावी असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोटार परिवहन विभागाला दिले. ते या अनुषंगाने विधानभवनात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते. ▶▶ पान २ वर

# दिवंगत अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांसह ७० जणांना न्यायालयाची 'क्लीन चिट'

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात अनेक वर्षे केंद्रस्थानी राहिलेल्या 'महाराष्ट्र राज्य सहकारी बँक' घोटाळा प्रकरणात शुक्रवारी (दि. २७) एक अत्यंत महत्त्वाचा निकाल समोर आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणातील आर्थिक गुन्हे शाखेचा क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे. या निर्णयामुळे दिवंगत नेते अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, रोहित पवार यांच्यासह ७० जणांना मिळालेली क्लीन चिट आता अधिकृतपणे कायम झाली आहे. या प्रकरणाचा तपास पुन्हा व्हावा यासाठी सामाजिक ▶▶ पान २ वर

# अजित पवार धुक्याने गेले की धोक्यानं?

## सरकार संशयाची भूतं नाचवत आहे; राज ठाकरेंचाही थेट सवाल



मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज अजितदादांच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी व्यापक बळ मिळावे, यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी तपशील सादर केल्यानंतर राज यांनीही एफआयआरवरून सरकारला धारेवर धरले. हा विषय कोणत्याही राजकारणाच्या पलीकडचा असून ▶▶ पान २ वर

# 'सारथी'मधील जागांत वाढ

## 'एमपीएससी' व 'यूपीएससी'च्या पूर्वप्रशिक्षणासाठी उपाययोजना



राहाता अ.नगर । प्रतिनिधी

'सारथी' संस्थेमार्फत पूर्व प्रशिक्षणासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) १०० जागांवरून ४०० तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) ४०० जागा वरून १ हजार जागा निर्माण करण्यास राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समितीने मान्यता दिल्याची माहिती मंत्रिमंडळाच्या मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे यांनी दिली. याबरोबरच 'सारथी'ने उद्योजकांच्या ▶▶ पान २ वर

### आठ वसतिगृहांची निर्मीती

सारथी संस्थेमार्फत राज्यात आठ वसतिगृहे उभारण्यात येत असून यापैकी सहा वसतिगृहाची कामे पूर्ण होत आहेत. या वसतिगृहांमध्ये ६००० विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था होईल, या वसतीगृहांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून येत्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करावीत तसेच वसतीगृहांचे व्यवस्थापन नामांकित संस्थांकडून करण्याच्या सूचनाही विखे यांनी बैठकीत दिल्या.

### ३४ योजनांसाठी २२२ कोटी खर्च

सारथी संस्थेमार्फत सन २०२५–२६ मध्ये एकूण ३४ प्रकारच्या योजना राबवण्यात आल्या. यासाठी ४८ हजार ३८१ मराठा, कुणबी मराठा, मराठा कुणबी समाजातील लक्षित गटाला एकूण २२२ कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली तसेच स्पर्धा परीक्षा व पूर्वपरीक्षणात प्रवेश घेतलेल्या एकूण ११७९ विद्यार्थ्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवले तसेच देशांतर्गत १६४ शिष्यवृत्तीधारक, कौशल्य विकास विभागामार्फत प्रशिक्षित झालेल्या १० हजार २०९ अशा एकूण ११ हजार ९१५ प्रशिक्षित प्रशिक्षार्थी विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध झाल्याचेही मंत्री विखे यांनी सांगितले.

# दारू पिऊन वाहन चालवल्यास 'ड्रायव्हिंग लायसन' रद्द

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**मद्यपान करून वाहन चालवल्याचे दिसून आले तर संबंधिताचे ड्रायव्हिंग लायसन रद्द केले जाईल अशी घोषणा केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. ते आयसीआयसीयद्वारा आयोजित रस्ते सुरक्षितता कार्यक्रमात बोलत होते.**

देशातील अपघातांच्या वाढत्या संख्येवर चिंता व्यक्त करून गडकरी म्हणाले, एखादी व्यक्ती मद्यपान करून गाडी चालवत असल्याचे वारंवार दिसून आले तर संबंधित चालकाचे ड्रायव्हिंग लायसन कायमस्वरूपी रद्द केले जाईल. देशात दरवर्षी पाच लाखांहून अधिक रस्ते अपघात होतात आणि त्यात सरासरी १ लाख, ८० हजार जणांचा अंत होतो. दखलपात्र बाब म्हणजे मृतांमध्ये १८ ते ४५ वयोगटातील लोकांची संख्या ७२ टक्के आहे. तसेच या अपघातांत १८ वर्षांखालील सुमारे दहा हजार जणांचा मृत्यू होतो. सीटबेल्ट आणि हेल्मेटचा वापर न केल्यामुळे वार्षिक ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### ब्लॅक बॉक्स अहवालावरून सपकाळांचे सवाल

मुंबई : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला महिना उलटूनही ब्लॅक बॉक्समधील माहिती जाहीर न झाल्याने संशय वाढत असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. अपघाताच्या तपासाचा अहवाल अद्याप समोर आला नसून सीबीआयमार्फत चौकशी का केली जात नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सरकारने या प्रकरणाचा वस्तुनिष्ठ अहवाल तातडीने जाहीर करावा, अशी मागणीही सपकाळ यांनी केली.

### शक्तिपीठ महामार्गावरून परभणीत वातावरण तापले

परभणी : प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन संपादनाला परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवत एक इंचही जमीन देणार नाही अशी भूमिका घेतली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीदरम्यान शेतकरी व प्रशासनामध्ये जोरदार वादावादी झाली. शेतकऱ्यांच्या भावना शासनापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले असून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत ५ मार्च रोजी मुंबई येथे पुढील बैठक होणार आहे. महामार्गामुळे शेतीचे नुकसान होणार असल्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

### व्हॉट्सअॅपसाठी सिम बाईंडिंग अनिवार्य

दिल्लीः केंद्र सरकारने सांगितले आहे की १ मार्च २०२६ पासून व्हॉट्सअॅपसारखी मेसेजिंग अॅप्स फक्त त्या फोनमध्ये चालतील ज्यामध्ये नोंदणीकृत सिमकार्ड असेल. सिम नसेल तर अॅप काम करणार नाही, आणि वेब व्हॉट्सअॅप ६ तासांनी आपोआप लॉगआऊट होईल. हे नियम राष्ट्रीय सुरक्षा आणि फसवणूक टाळण्यासाठी आहेत. नियमांचे उल्लंघन केल्यास दूरसंचार कायदा आणि इतर लागू कायद्यांनुसार कारवाई होईल.

### 'द केरळ स्टोरी २' चित्रपटावर स्थगिती

दिल्लीः केरळ उच्च न्यायालयाने 'द केरळ स्टोरी २' चित्रपटावर तातडीने स्थगिती आणली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार २७ फेब्रुवारीपासून चित्रपट प्रदर्शित करू नये, कारण याचिकांमध्ये चित्रपटात केरळचे नकारात्मक चित्रण केल्याचा दावा केला होता. काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी–वड्रा यांनी म्हटले की लोकांना स्वतः व्यक्त करण्याची मुभा असली पाहिजे, पण समाजात आनंद, प्रेम आणि एकत्रितता वाढवणाऱ्या गोष्टी करणे महत्त्वाचे आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२७ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२५.५० क्विंटल | १,८०० | २,६०१ | २,२१९ |
| ज्वारी/हायब्रिड: ६७.०० क्विंटल | २,४०१ | ४,०५० | ३,३५५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ९.०० क्विंटल | ५,००० | ७,६११ | ६,७५४ |
| उडीद : १.५० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| बाजरी: ८.०० क्विंटल | २,६०० | ३,०६० | २,८६३ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| सोयाबीन: ४२.५० क्विंटल | ५,०५० | ५,२०० | ५,११६ |
| हरभरा: ५४.०० क्विंटल | ४,९७५ | ५,०५१ | ५,००९ |

cmyk

## अग्रलेख

# राज्यसभेचे मैदान कोण मारणार

राज्यसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. एप्रिलला या निवडणुका होत असून राज्यातून सात खासदार नव्याने राज्यसभेवर जाणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदास आठवले, रायगड मधील पेणचे धैर्यशील पाटील, शिवसेनेच्या प्रियंका चतुर्वेदी, रजनी पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फौजीया खान हे सात सदस्य दोन एप्रिल २०२६ रोजी राज्यसभेतून निवृत्त होत आहेत. राज्य विधानसभेतील २८८ आमदार हे राज्यसभा सदस्य निवडून देणार आहेत. त्यामुळे एका जागेसाठी पहिल्या फेरीत निवडून येण्यासाठी ३७ मतांची गरज आहे.

महायुतीकडे म्हणजेच भाजप शिंदे सेना राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा या पक्षांकडे एकूण २२० पेक्षा जास्त आमदार असल्याने या सर्वांचे सहा सदस्य राज्यसभेत जाऊ शकतात तर महाविकास आघाडीकडे फक्त एक सदस्य जाऊ शकेल एवढी मते आहेत.

भाजपकडून गेली दोन टर्म संधी उकलेले राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांचे नाव चर्चेत आहे. पण भाजप मध्ये नाव चर्चेत असून संधी मिळेल याची शक्यता नसते. पहिल्यावेळी विनोद तावडे यांचे नाव चर्चेत होते परंतु अचानक विधानसभेतील पराभूत उमेदवार आणि राज्यातील माजी कृषिमंत्री डॉ. अनिल बोंडे यांना राज्यसभेवर भाजपने संधी दिली होती. दोन वर्षांपूर्वी अचानक माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना भाजपने राज्यसभेवर संधी दिली. दोनदा संधी हुकलेले विनोद तावडे यांना यावेळी तरी भाजप पक्षश्रेष्ठी संधी देणार का याविषयी चर्चा सुरू आहे. एका राज्यसभा निवडणुकीत डमी उमेदवार म्हणून अर्ज भरणाऱ्या विजया रहाटकर यांचे नाव राज्यसभा निवडणूक आली की नेहमी चर्चेत असते. सध्या त्या राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष आहेत. त्यामुळे पक्ष त्यांना संधी देईल का याविषयी साशंकता आहे. केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल लोकसभेवर निवडून गेल्यानंतर त्यांच्या जागी पेणचे शेकापचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांना राज्यसभेत संधी मिळाली होती. फर्डा वक्ता आणि मेहनती कार्यकर्ता असलेल्या पाटील यांना भाजपने आपल्याकडे प्रवेश देऊन त्यांना थेट राज्यसभेत पाठवले. परंतु ही संधी केवळ दोनच वर्षे मिळाल्याने त्यांना पुन्हा संधी देण्याचा भाजप विचार करत आहे. केंद्रीय समाज कल्याण मंत्री रामदास आठवले यांनाही भाजप पुन्हा संधी देईल.

महाविकास आघाडीत राज्यसभेच्या उमेदवारीवरून सुंदोपसुंदी सुरू आहे. शिवसेना ठाकरे गटाकडे वीस आमदार आहेत तर काँग्रेसचे १६ आमदार आहेत मात्र राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे फक्त दहाच आमदार आहेत. अशा परिस्थितीत शिवसेना नेते संजय राऊत यांनी शरद पवार यांच्या उमेदवारीची चर्चा सुरू केली आहे. मात्र काँग्रेसने या उमेदवारीला कोणताही दुजोरा दिलेला नाही. शिवसेनेने ही शरद पवार यांच्या नावाला पक्ष म्हणून पाठिंबा अद्याप दिलेला नाही. महाविकास आघाडीतील समाजवादी पार्टीकडे दोन जागा आहेत तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडे एक आमदार आहे. भाजपचा साथीदार असलेल्या जनसुराज्य शक्ती या पक्षाकडे दोन आमदार आहेत तर एम आय एम या पक्षाकडे एक आमदार आहे.

शिवसेना शिंदे गटाकडे चाळीस आमदार असून त्यांचा एक सदस्य राज्यसभेत जाऊ शकतो. लोकसभा पराभूत झालेले राहुल शेवाळे यांच्या नावावर जवळजवळ शिक्कामोर्तब झाले आहे. दोन वर्षांपूर्वी झालेल्या राज्यसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने मुंबई काँग्रेसचे सर्वेसर्वा दिवंगत मुरली देवरा यांचे सुपुत्र माजी खासदार मिलिंद देवरा यांना राज्यसभेत पाठवले होते. मात्र यावेळी राहुल शेवाळे यांना संधी मिळणार याविषयी पक्षात कुणाचीही दुमत नाही.

राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे अजित दादांचे सुपुत्र पार्थ पवार यांना आता संधी मिळणार की नंतर मिळणार याचा निर्णय अद्याप झालेला नाही. कारण सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्या नंतर त्यांची राज्यसभेची जागा रिक्त झाली आहे. त्यामुळे पार्थ पवार त्या जागी जाणार की त्यांना आता संधी मिळणार हे अद्याप ठरलेले नाही.

महायुतीचे सहा सदस्य राज्यसभेवर जाणार याविषयी कोणालाही शंका नाही. त्यापैकी चार सदस्य हे भाजपचे असतील आणि दोन सदस्य हे शिंदे सेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट यांचे असतील.

फक्त महाविकास आघाडीतच अद्याप उमेदवारीवरून वाद प्रतिवाद सुरू आहेत. राज्यसभेवर आता शरद पवार यांना संधी द्यायची आणि पुढच्या वर्षी विधानपरिषद निवडणुकीत उद्धव ठाकरे यांना संधी द्यायची असे अंडरस्टँडिंग राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत झाल्याची चर्चा आहे. मात्र काँग्रेसने आता राज्यसभा इतर पक्षांना सोडल्यास विधान परिषदेत काँग्रेसला संधी हवी अशी अट घातली आहे.

## रामजन्मभूमी अयोध्या येथे संत एकनाथ महाराज कृत श्री भावार्थ रामायण कथा संपन्न!

**बीड । प्रतिनिधी**

एकनाथ महाराजांचे भावार्थ रामायण हे महाराष्ट्रातील शेकडो गावांमध्ये वाचक व सूचक या पद्धतीने सांगितले जाते. त्यात लक्ष्मण शक्तीचे कार्यक्रम होतात. मात्र एकनाथ महाराज लिखित रामायणाची संगीतमय कथा आणि तेही थेट रामजन्मभूमी अयोध्येत संत एकनाथ महाराजांचे चौदावे वंशज श्री योगिराज महाराज पैठणकर यांच्या मुखातून हिंदी भाषेत प्रथमच संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र व उत्तर प्रदेशीतील सुमारे ५-६ हजार भाविकांनी उपस्थिती दर्शविली. अयोध्येतील अनेक संत महंतांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली. एवढ्या मोठ्या प्रमाणात भावार्थ रामायण कथा होण्याची ही प्रथमच वेळ आहे. यानंतरही महाराष्ट्रासह भारतभर एकनाथ महाराजांच्या या सप्तकांडात्मक रामायणाच्या कथा करण्यात येतील असा संकल्प योगिराज महाराजांनी केला. या कार्यक्रमाचे आयोजक मुंबई येथील वसई भागातील तुंगारेश्वर देवस्थानचे प्रमुख बालयोगी श्री सदानंद महाराज त्यांची संयोजन समिती हे होते. या कथेचे वक्ता श्री योगिराज महाराज यांनी एकनाथ महाराजांचे रामायण जगभर पोचावे यासाठी हिंदी भाषेतुन कथा सांगितली. यावेळी हजारो भाविकांच्या उपस्थितीत वारकरी संप्रदायाची दिंडी काढण्यात आली. हा सप्ताह दिनांक १९ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालखंडात पार पडला. यावेळी दररोज महनीय कीर्तनकारांची कीर्तने संपन्न झाली. तसेच रामजन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराजांनी छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे चरित्र प्रतिपादन केले. दीपोत्सव करुन दुसऱ्या दिवशी योगिराज महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची मोठ्या भक्तीमय वातावरणात सांगता झाली. याप्रसंगी संयोजन समितीने भाविकांना सर्वप्रकारच्या उचित सुविधा पुरवल्या.



# पिंपळनेर शिवारामध्ये कांद्याच्या पिकात अफूची शेती

## पोलिसांचा छापा; १०.५८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

**पोलीस स्टेशन पिंपळनेरच्या पथकाने मौजे पिंपळनेर शिवारात एका शेतावर छापा टाकून, कांद्याच्या पिकात लपवून केलेली अफूची बेकायदेशीर लागवड उघडकीस आणली आहे. या कारवाईत सुमारे ४२ किलोपेक्षा जास्त वजनाची अफूची झाडे जप्त करण्यात आली असून आरोपीविरुद्ध एन.डी.पी.एस. कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

विशाल भगवान इतापे (वय २९, रा. पिंपळनेर) हा आपल्या शेतात अफूच्या झाडांची बेकायदेशीर लागवड व जोपासना करत आहे. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगीने आणि महसूल विभागाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दुपारी १५.०० वाजता सदर शेतावर छापा टाकण्यात आला. अफूची झाडे: शेतातील कांदा व लसूण पिकाच्या मध्यभागी लावलेली अफूची हिरवीगार झाडे पोलिसांनी उपटून जप्त केली.एकूण वजन: जप्त केलेल्या अफूच्या झाडांचे एकूण वजन ४२ किलो ३५५ ग्रॅम भरले. बाजार मूल्य: जप्त करण्यात आलेल्या या मालाची अंदाजे किंमत १०,५८,८७५/- रुपये इतकी आहे. सदर कारवाई मा नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक, पूजा पवार पोलीस उप अधीक्षक यांच्या मार्गदर्शनात सपोनि श्री. घुगे, पोउपनि गोलवाल, शिंदे, ग्रेड पोउपनि आत्माराम गर्जे आणि पोलीस कर्मचारी वनवे, घुमरे, पठाण, ढाकणे, तावरे व चालक पवार यांच्या पथकाने केली. या मोहिमेत महसूल विभागाचे प्रतिनिधी म्हणून श्री. प्रशांत ढोले (ग्राम महसूल अधिकारी) आणि कृषी सहाय्यक शिंदे उपस्थित होते आरोपी विशाल भगवान इतापे याच्या विरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायदा च्या कलम ८(क) आणि १५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



# पोलीस पाटील भरती प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह; संबंधित कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी




**माजलगाव प्रतिनिधी**

**माजलगाव उपविभागात पोलीस पाटील भरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत बहुजन समाज पार्टीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. ह्या प्रकरणात छत्रपती संभाजीनगर येथील एम. टेक मल्टी सर्विसेस कंपनीवर गुन्हा दाखल करून काळ्या यादीत टाकण्याची मागणी करण्यात आली आहे.**

उपविभाग माजलगाव अंतर्गत रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदांसाठी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षा पूर्ण झाल्यानंतर मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. मात्र, शासनाच्या निर्णयानुसार ८० गुणांच्या परीक्षेत किमान ३६ गुण (४५ टक्के) मिळणे आवश्यक होते. निवेदनात आरोप करण्यात आले आहे की, काही उमेदवार ज्यांनी किमान गुण मिळवले नाहीत, त्यांची नावे गुणवत्ता यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत, तर काही पात्र उमेदवारांची नावे वगळण्यात आली आहेत. यामुळे भरती प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निवेदनात पुढे नमूद केले आहे की, गुणवंत उमेदवारांची नावे वगळली गेल्यामुळे अन्याय झाला असून, ही प्रक्रिया सुधारण्यासाठी तत्काळ सुधारित व अधिकृत पात्र उमेदवारांची यादी जाहीर करावी. तसेच, अनियमिततेस जबाबदार असलेल्या एम. टेक मल्टी सर्विसेस कंपनीवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन हेमंत गोरे, अशोक काळे, नामदेव सवासे, पांडुरंग काळे, अविनाश लवटे आणि रुपाली नागरगोजे यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले असून, निवेदक म्हणून ॲड. अमोल डोंगरे, जिल्हा प्रभारी, बीड - बहुजन समाज पार्टी यांनी पाठपुरावा केला आहे. निवेदनात इशारा देण्यात आला आहे की, जर मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर उपविभागीय कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल. ही घटना पोलीस पाटील भरती प्रक्रियेतील पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत असून, स्थानिक समाज आणि राजकीय वर्तुळात ती चर्चेचा विषय ठरली आहे.

## पान १ वरून...

### राज्यातील साखर

महासंचालक दीपक बल्लानी यांनी मांडली. 'इस्मा'कडून देशातील साखरेच्या उत्पादनाचा अंदाज जाहीर करण्यात आला. या वेळी बोलताना बल्लानी यांनी साखर उद्योगासमोरील अडचणी मांडल्या. 'साखरेचा सरासरी उत्पादन खर्च प्रतिकिलो ४१.७ रुपये असून, साखरेची विक्री किंमत महाराष्ट्र आणि कर्नाटकात प्रतिकिलो ३७ रुपये आहे. त्याचा फटका कारखान्यांना बसत आहे. सरकारने साखरेची किमान विक्री किंमत २०१९ पासून ३१ रुपयांवर स्थिर ठेवली आहे. त्याच वेळी उसाची रास्त आणि किफायतशीर किंमत गेल्या पाच वर्षांत ३० टक्के वाढली आहे असे त्यांनी नमूद केले. ते म्हणाले, 'उसाच्या 'एफआरपी'शी साखरेची 'एमएसपी' संलग्न करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे ऊस आणि साखरेच्या दरात योग्य संतुलन राखण्यास मदत होईल. साखरेच्या उत्पादन खर्चापेक्षा विक्री किंमत कमी असल्याने कारखाने आर्थिक अडचणीत येत आहेत. महाराष्ट्रातील कारखान्यांकडे शेतक-यांचे 'एफआरपी'चे ४ हजार ५०० कोटी रुपये थकीत आहेत. ही परिस्थिती सुधारण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता आहे. अन्यथा, कारखान्यांसह शेतक-यांसाठी हे आर्थिक संकट बनेल.' सरकारकडून दर वर्षी उसाच्या 'एफआरपी'मध्ये वाढ केली जात आहे. परंतु, २०१९ पासून साखरेच्या 'एमएसपी'मध्ये वाढ करण्यात आलेली नाही. सरकारने साखरेची 'एमएसपी' वाढविल्यास विक्री किंमतही वाढेल. त्यामुळे कारखान्यांना होणारा तोटा कमी होऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

-------------

### महादेव मुंडे हत्याप्रकरण, नार्को

वाल्मीक कराडचे सहकारी बाळा बांगर यांनी महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणात अनेक खळबळजनक दावे केले आहेत. हत्या केल्यानंतर वाल्मीक कराडनं टेबलावर मुंडेंचं कातड हाड आणि रक्त आणून ठेवलेलं होतं, दावा बाळा बांगर यांनी केला होता.प्रमुख आयपीएस अधिकारी पंकज कुमावत यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक (डखढ) काम करत आहे. या प्रकरणात अनेक साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत. त्यामध्ये विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांचे जवळपास तीन वेळा जबाब नोंदवण्यात आले. ऑक्टोबर, जुलै आणि नोव्हेंबर या तीन महिन्यांत त्यांनी एसआयटीसमोर तसेच कॅमेऱ्यासमोर जबाब दिला आहे. या जबाबांमध्ये त्याने वाल्मीक कराडच्या मुलाचे नाव अनेकदा घेतल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे वाल्मीक कराडच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकूणच, महादेव मुंडे हत्या प्रकरणाचे धागेदोरे आता वाल्मीक कराडच्या मुलापर्यंत पोहोचत असल्याचे दिसून येत आहे.एसआयटीने गेल्या सहा महिन्यांत सुमारे २०० लोकांची कसून चौकशी केली आहे. १५० हून अधिक संशयित आणि ५०० हून अधिक लोकांचे कॉल डिटेल्स तपासण्यात आले.

----------

### मंत्र्यांनी बोलवल्या बैठकीला

एम. देवेंद्र सिंग उपस्थित राहिले नव्हते. एम. देवेंद्र सिंग हे २०११ च्या बॅचचे आयएएस अधिकारी असून सध्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव आहेत. त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित होती. त्यानुसार, त्यांचे निलंबन करण्यात आल्याचे संबंधित आदेशात म्हटले आहे. अतिरिक्त सचिव व्ही. राधा यांच्या सहीने ही कारवाई करण्यात आली आहे. अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६९ मधील नियम ३ च्या उपनियम (१) च्या कलम (र) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन एम. देवेंद्र सिंग, आयएएस , सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना तत्काळ प्रभावाने निलंबित करीत आहे. तसेच, हा आदेश लागू असताना देवेंद्र सिंग यांचे मुख्यालय मुंबई येथे राहील आणि त्यांनी कोकण विभाग, मुंबई येथील विभागीय आयुक्त यांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय मुख्यालय सोडू नये. निलंबन काळात त्यांना कोणतीही खासगी नोकरी स्वीकारणे किंवा कोणत्याही व्यापार किंवा व्यवसायात सहभागी होणे मान्य राहणार नाही, असेही आदेशात म्हटले आहे.

-------------

### एक मार्चपासून अवैध प्रवासी

मंत्री सरनाईक म्हणाले क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेणे, वाहनांची नियमित तपासणी न करणे आणि सुरक्षाविषयक नियमांकडे दुर्लक्ष करणे या प्रकारांमुळे अपघातांच्या घटना वाढण्याची शक्यता अधिक असते. अशा वाहनांना वैध विमा नसल्यास अपघातानंतर प्रवाशांना नुकसानभरपाई मिळवणे कठीण होते. अनेक वेळा वाहनमालक किंवा चालक जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे पीडितांना न्याय मिळण्यात विलंब होतो. दरम्यान, ऑनलाइन आणि पारदर्शक परवाना प्रक्रियेच्या माध्यमातून कायदेशीर वाहतूक सुलभ करणे, तसेच प्रवाशांनीही परवानाधारक सेवांचा वापर करण्याची जबाबदारी स्वीकारणे, ही काळाची गरज आहे. अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई आणि जनसहभाग या दोनच मार्गांनी सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह वाहतूक व्यवस्था निर्माण होऊ शकते, असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

**नियोजित मार्ग व वेळापत्रकावरही परिणाम**

अवैध वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलालाही मोठे नुकसान सहन करावे लागते. नियम पाळणा-या एसटी महामंडळासारख्या कायदेशीर वाहतूकदारांवर अन्यायकारक स्पर्धेचे ओझे येते. दरकपात आणि अनियमित बाजारपेठेमुळे अधिकृत सेवा आर्थिक अडचणीत सापडतात. एसटी सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील प्रवासीसंख्या घटल्याने नियोजित मार्ग व वेळापत्रकावरही त्याचा परिणाम होतो.

-----------

### मद्य घोटाळ्याच्या आरोपातून

मात्र या सर्व आरोपातून कोर्टाने निर्दोष मुक्तता केल्यानं अरविंद केजरीवाल यांच्या डोळ्यात अश्रू आले. मोदी-शाह यांनी षडयंत्र रचले आणि आम्हाला भ्रष्टाचारी ठरवले होते असा आरोप केजरीवाल यांनी केला. कोर्टाने आरोपातून निर्दोष मुक्तता केल्यानंतर अरविंद केजरीवाल भावूक झाले. अरविंद केजरीवाल म्हणाले की, सत्येचा विजय होतो हे आम्ही कायम म्हणत होतो. आमचा भारतीय न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे. न्यायाधीशांनी आम्हाला न्याय दिला. सत्याचा विजय झाला आहे. आम आदमी पक्षाला संपवण्यासाठी नरेंद्र मोदी-अमित शाह यांनी मिळून सर्वात मोठे षडयंत्र रचले. आमच्या नेत्यांना जेलमध्ये टाकले गेले. विद्यमान मुख्यमंत्र्यांना घरातून बाहेर काढत ६ महिने जेलमध्ये ठेवले. उपमुख्यमंत्र्यांना २ वर्ष जेलमध्ये ठेवले. हे सगळे खोटे गुन्हे होते. आम्हाला भ्रष्टाचारी ठरवण्यात येत होते असं सांगताना अरविंद केजरीवाल यांच्या डोळ्यात अश्रू आले. तर मी भ्रष्ट नाही. मी माझ्या प्रामाणिकपणाने जीवन जगतोय. आमच्यावर खोटे आरोप लावले परंतु आज कोर्टात सिद्ध झाले. अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया असो आम आदमी पक्ष हा प्रामाणिक आहे. सत्तेसाठी पंतप्रधानांनी देशाशी खेळू नये. संविधानाशी खेळू नका. तुम्हाला सत्ता हवी तर चांगली कामे करा. आज देशासमोर कित्येक प्रश्न आहे. महागाई, बेरोजगारी त्याशिवाय देशात रस्त्यांची दुरावस्था आहे. सगळीकडे प्रदुषण आहे. चहुबाजूने देशात वेगवेगळ्या समस्या आहेत. त्या समस्यांचे निवारण करून सत्ता मिळवा. केजरीवाल आणि आम आदमी पक्षावर खोटे आरोप का करता असा सवालही केजरीवाल यांनी उपस्थित केला.

-------------

### वाल्मिक कराडच्या

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड याच्या मुलाने फेसबुक पोस्ट करत लक्ष वेधले आहे. आता मात्र सर्वासमोर सर्व काही बोलणार... अशा आशयाची पोस्ट सुशील कराडने केली आहे. त्यामुळे, हत्याप्रकरणाबाबत आता वाल्मीक कराडचा मुलगा सुशील कराड नेमकं काय बोलणार याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. विशेष म्हणजे वाल्मिक कराडचा जामीन अर्ज सुप्रीम कोर्टाने फेटाळल्यानंतर आज त्याच्या मुलाने केलेली ही फेसबुक पोस्ट चर्चे आहे. त्यामुळे, संतोष देशमुख प्रकरण किंवा महादेव मुंडे प्रकरण, नेमकं कोणत्या गुन्ह्याबाबत वाल्मिकचा मुलगा बोलणार हे लवकरच स्पष्ट होईल.

--------

### अजित पवार धुक्यान

महाराष्ट्रासाठी अत्यंत दुर्दैवी आहे. रोहित पवारांनी हा प्रश्न सुरू असलेल्या विधानसभा अधिवेशनात मांडावा आणि राष्ट्रवादीच्या खासदारांनी हा मुद्दा लोकसभेत उपस्थित करावा, असं मी त्यांना सांगितलं असल्याचे ते म्हणाले. राज ठाकरे यांनी सांगितलं की, रोहित पवार यांच्या बोलण्यातून मला एकच मुख्य गोष्ट जाणवली ती म्हणजे त्यांनी तीन ठिकाणी एफआयआर (ऋखठ) नोंदवण्याचा प्रयत्न केला, पण तिन्ही ठिकाणी सरकारने तो घेऊ दिला नाही. मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशनमध्ये जेव्हा अधिकारी एफआयआर टाईप करत होते, तेव्हा तिथल्या डीसीपींनी येऊन तो लिहून न घेण्याच्या सूचना दिल्या. सरकार किंवा पोलीस स्टेशनला हा एफआयआर का नको आहे? अजित पवारांसारख्या मोठ्या नेत्याच्या मृत्यू प्रकरणात जर एफआयआर नोंदवला जात नसेल, तर सर्वसामान्य माणसाचे काय होणार? अशी विचारणा राज यांनी केली. राज ठाकरे म्हणाले की, जर हा केवळ अपघात असेल आणि घातपात नसेल, तर तक्रार नोंदवण्याला सरकारकडून अडथळे का आणले जात आहेत? यामुळेच 'काहीतरी काळभेर आहे' असा संशय निर्माण होतो. सरकार या संपूर्ण प्रकरणामागे 'संशयाची भूतं' नाचवतंय असं मला वाटतंय. एफआयआर नोंदवल्यानंतर ज्या गोष्टी सांगितल्या जातील, त्याप्रमाणे चौकशी व्हावी, हे अत्यंत सोपे आहे, पण सरकार पोलीस यंत्रणेवर दबाव टाकत असल्याचा आरोप राज यांनी केला. राज यांनी सांगितले की, सुनेत्रा वहिनी सध्या तिथे उपमुख्यमंत्री म्हणून बसल्या आहेत, त्यांनी या गोष्टीचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. अजित पवार त्यांचे पती होते आणि त्यांच्याच पतीच्या अपघाताबद्दल हा एफआयआर आहे, त्यामुळे सुनेत्रा वहिनींनी या विषयावर बोललं पाहिजे, अशी भावना राज यांनी व्यक्त केली. मनसे अध्यक्षांनी सांगितले की, विमान कितीही उद्ध्वस्त झाले तरी 'ब्लॅक बॉक्स' कधीच नष्ट होत नाही, परंतु त्याचे काय झाले हे अजूनही महाराष्ट्राला समजत नाही. सीआयडी आणि सीबीआय चौकशी नक्की कुठपर्यंत आली आहे आणि डीजीसीएचा अहवाल अद्याप का आला नाही, हे प्रश्न अनुत्तरित आहेत. एका महिन्याच्या आत प्राथमिक अहवाल देण्याचे आश्वासन दिले होते, मात्र तो अद्याप सादर झालेला नाही, ज्यामुळे लोकांच्या मनात शंका निर्माण होत आहेत, असे राज यांनी सांगितलं.

-----------

### दिवंगत अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा

कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी दाखल केलेला आक्षेप अर्ज आणि अंमलबजावणी संचालनालयाने (एऊ) दिलेला हस्तक्षेप अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला आहे. ईडीने हा अर्ज टिकवण्यासाठी न्यायालयात जोरदार प्रयत्न केले होते, मात्र पुराव्यांच्या अभावी न्यायालयाने तो फेटाळून लावत तपास बंद करण्यावर शिक्कामोर्तब केले. २००७ ते २०११ या काळात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या तत्कालीन संचालक मंडळाने निकषांना बगल देत साखर कारखाने आणि सूतगिरण्यांना नियमबाह्य पद्धतीने कर्ज वाटप केल्याचा आरोप होता. यातील अनेक साखर कारखाने एनपीए झाले होते, त्यांना पुन्हा कर्ज देऊन, पुढे कर्ज फेडले न गेल्यामुळे हे कारखाने कवडीमोल भावात संचालकांच्या नातेवाईकांनी हस्तगत केल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला होता. यावरून राज्यात प्रचंड राजकीय गदारोळ झाला होता.

---------

### दारू पिऊन वाहन चालवल्यास

सुमारे ६८ हजार जणांना जीव गमवावा लागतो. अतिवेग, वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलणे हीदेखील अपघातांमागील मुख्य कारणे आहेत. हे रोखण्यासाठी प्रामुख्याने युवक आणि किशोरवयीन मुलांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या गरजेवर गडकरी यांनी भर दिला.

------------

### 'सारथी'मधील जागांत

संघटनांशी संपर्क ठेवून औद्योगिक व सेवा क्षेत्रात मागणी असलेल्या कौशल्य प्रशिक्षणाचे कार्यक्रम सुरू करावेत, यासाठी नामांकित प्रशिक्षण संस्थांचे मार्गदर्शन घ्यावे, अशीही सूचना केली आहे. मंत्री विखे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात सारथी संस्थेच्या संचालकांची तसेच संबंधित विभागातील वरिष्ठ अधिका-यांची बैठक झाली. त्यावेळी विखे बोलत होते. 'सारथी'चे संचालक मधुकर कोकाटे, उमाकांत दांगट, व्यवस्थापकीय संचालक सुरज मांढरे आदी उपस्थित होते. उपसमितीचे अध्यक्षपद विखे यांनी स्वीकारल्यापासून झालेली ही नववी बैठक होती. बैठकीत मंत्री विखे यांनी 'सारथी'मार्फत राबवल्या जाणा-या उपक्रमांचा, उपलब्ध नीधीचा आढावा घेतला. व्यवस्थापकीय संचालक सुरज मांढरे यांनी 'सारथी'च्या उपक्रमांची माहिती दिली. सारथी'च्या उपक्रमांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक ते सर्व पाठबळ देण्याबाबत मंत्री विखे यांनी पदाधिका-यांना आश्वासित केले. राज्य सरकारने सन २०२६- २६ आर्थिक वर्षात ५१५ कोटी रुपयांची तरतूद केली होती, त्यापैकी ४५२ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. पुरवणी मागण्यांमध्येही ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याची माहिती त्यांनी दिली.

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात

### आष्टीच्या कृषि तंत्र विद्यालयाच्या कबड्डी संघाने रौप्यपदक पटकावले

आष्टी । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापिठ,परभणी अंतर्गत बीड जिल्हास्तरीय अंतर कृषि तंत्र विद्यालयीन क्रिडा स्पर्धेचे आयोजन कृषि तंत्र विद्यालय, नवगन (रा) व घटक कृषि तंत्र विद्यालय,अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथे दि.२४ व २५ फेब्रुवारी या कालावधीत आयोजन करण्यात आले होते.या क्रीडा महोत्सवामध्ये बीड जिल्ह्यातील कृषी तंत्र विद्यालय आष्टी, दासखेड,अंबाजोगाई,देवगाव, लुखामसला व नवगण (रा.) येथील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.या क्रीडा स्पर्धेमध्ये खो-खो कबड्डी इत्यादी या मैदानी खेळाबरोबरच १००, २००, ४०० मीटर धावणे,गोळा फेक, लांब उडी यासारख्या वैयक्तिक क्रीडा प्रकाराचा समावेश होता. कृषी तंत्र विद्यालय आष्टी संघाने सांघिक तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये सहभाग नोंदवला. आष्टी येथील कृषि तंत्र विद्यालयाच्या कबड्डी संघाने उत्कृष्ट प्रकारे सांघिक खेळाचे दर्शन घडवून रौप्यपदक पटकावले आहे. वैयक्तिक क्रिडा प्रकारात प्रविण झगडे या विद्यार्थ्याने गोळाफेकमध्ये रौप्यपदक तसेच राम काळे या विद्यार्थ्याने ४०० मीटर धावण्यामध्ये कांस्यपदक पटकावले.क्रिडा महोत्सवाचे उत्घाटन,बक्षीस वितरण व समारोप समारंभासाठी डॉ. संचालक तथा अधिष्ठाता शिक्षण भगवान आसेवार, सहयोगी अधिष्ठाता,(शिक्षण निम्नस्तर)



डॉ.गजेंद्र लोंढे यांच्या हस्ते झाले.विजेते संघांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.कृषी तंत्र विद्यालय,आष्टी येथील सहभागी विद्यार्थी,संघ प्रशिक्षक प्रा.विष्णू ससाणे,संघ व्यवस्थापक प्रा.उद्धव घुले,कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य प्रा.जे. व्ही.सानप यांचे आनंद चॅरीटेबल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे, सहसचिव डॉ.अजय धोंडे कोषाध्यक्ष अभय धोंडे,प्रशासन अधिकारी डॉ.डी.बी.राऊत, श्री.छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालय प्राचार्य डॉ.श्रीराम आरसूळ यांनी अभिनंदन केले.

### एनएमएमएस परीक्षेत जवळा विद्यालयातील विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ग्रामीण भागातील दर्जेदार शैक्षणिक संकुल म्हणून विविध शैक्षणिक उपक्रमात सातत्याने अग्रेसर असणाऱ्या जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवी वर्गातील विद्यार्थ्यांनीं एन. एम. एम. एस. परीक्षेत अतिशय चमकदार यश मिळवत स्वतः सोबतच पालक आणि शाळेचा सन्मान वाढवला आहे. या शाळेतील खांडे रोहन राजेंद्र १३४ गुण, राऊत अनुष्का शत्रुघ्न ११४ गुण, खांडे अक्षरा भारत ९८ गुण, मोरे ओमकार अशोक ७९ गुण, राऊत श्रेयस मच्छिंद्र ७५ गुण, खांडे रोहित वसुदेव ७४ गुण, सोनवणे श्रुती भारत ६६ गुण असे गुण मिळवत त्यांनी या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल सदर यशवंत विदयार्थी व त्यांच्या पालकांचे संस्था अध्यक्ष माजी आमदार राजेंद्र जगताप, सचिव युवराज (भैय्या ) जगताप, संचालक शंकरराव जगताप, म्हाळस जवळयाचे माजी सरपंच शहादेव (आबा ) खांडे,मुख्याध्यापक तथा प्रचार्य प्रदीप गाडे, पर्यवेक्षक रमेश डोळे, वरिष्ठ लिपिक मंजूर शेख,विज्ञान शिक्षक अनिल पाटील या सोबतच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# कॉपीमुक्त वातावरणामध्ये दहावी व बारावी परिक्षा सुरु

## ✻ सीसीटीव्ही व झुम ॲपची प्रत्येक विद्यार्थ्यावर करडी नजर ✻ कॉपीमुक्त परिक्षांमुळे पालकांमध्ये समाधान

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरासह तालुक्यामध्ये अतिशय कडक बंदोबस्तात दहावी व बारावी बोर्डाच्या परिक्षा या संपुर्णपणे कॉपीमुक्त वातावरणात संपन्न होत असून सध्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व दोन्ही शिक्षणाधिकारी यांनी राबविलेल्या या विशिष्ट अशा कॉपीमुक्त अभियानामुळे तसेच प्रत्येक परिक्षा दालनातील सीसीटीव्ही कॅमेरा आणि झुम ॲपव्दारे संपूर्ण हॉलचे ऑनलाईन सनियंत्रण होत असल्याने यंदा कॉपी बहाद्दरांना चांगलाच दणका बसला असून कॉपीच्या भरोशावर बसलेले सर्व बहाद्दर धास्तावले आहेत.

फार पूर्वीच्या काळी बीड जिल्ह्यामध्ये बोर्डाच्या परिक्षांदरम्यान धिवरे कॉपीमुक्ती पॅटर्न खुप गाजला होता. त्यानंतर यंदा प्रथमच कॉपीमुक्त परिक्षेचा पॅटर्न वडवणीसह तालुक्यात अतिशय चांगल्या पध्दतीने राबविल्याचे दिसून येत आहे. मागील चौसाळा येथील परिक्षा केंद्रावरील गैरप्रकरणामुळे सध्या बीड जिल्ह्यासह सर्वच केंद्रांवर सर्वांनीच त्या कारवाईची मोठी धास्ती घेतल्याचे दिसून येत आहे. परिणामी कुठल्याही प्रकारे कसलीच कॉपी कोणत्याच सेंटरवर दिसून येत नाही. बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी राबवलेला कॉपीमुक्तीचा पॅटर्न यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे. याचाच प्रत्यय वडवणी तालुक्यात देखील आला असून वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या उत्तम नियोजनाखाली सर्वच परिक्षा केंद्रांवर दहावी व बारावीच्या परिक्षा यशस्वीरित्या पार पडत आहेत. इतिहासात प्रथमच प्रत्येक परिक्षा केंद्रावरील प्रत्येक परिक्षा हॉलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्यात आलेले असून त्याच बरोबर झुम ॲपव्दारे प्रत्येक पेपरला परिक्षा हॉलवरील पर्यवेक्षक यांच्या मोबाईलव्दारे संपूर्ण हॉलचे व त्या वर्गातील सर्व हालचालींचे चित्र व संवाद याचे ऑनलाईनपणे संपूर्ण चित्रीकरण



व संनियंत्रण होत आहे. परिणामी परिक्षार्थी मान वळवून देखील इकडे तिकडे पाहणे दुरापस्त झालेले आहे. सीसीटीव्ही कॅमेरा व झुम ॲप याच्या संनियंत्रणासाठी वडवणी येथील परिरक्षक केंद्र असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय याठिकाणी मुख्य परिरक्षक तथा गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या मार्गदर्शनाखाली या परिक्षांसाठी वॉर रुम उभारण्यात आलेली असून त्या ठिकाणाहून तालुक्यातील सर्व परिक्षा केंद्रांवरील प्रत्येक हॉल व त्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांवर बारकाईने नजर ठेवली जात आहे. तसेच जिल्हास्तरावरील वॉर रुम याठिकाणी देखील तालुक्यातील सर्व परिक्षा केंद्रांचे सीसीटीव्हीचे संनियंत्रण देण्यात आलेले आहे. बारावी बोर्डाच्या परिक्षेसाठी वडवणी परिरक्षक केंद्रांतर्गत एकूण आठ परिक्षा केंद्र असून यामध्ये महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी, छत्रपती राजर्षी शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी, लोकमान्य टिळक महाविद्यालय वडवणी, सिध्दीविनायक महाविद्यालय पिंपळनेर, सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तेलगांव, अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचाळा, मंकावती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचवण, नविन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लिंबारुई देवी यांचा समावेश होतो. या आठ परिक्षा केंद्रांमध्ये एकूण ३ हजार १४९ विद्यार्थी हे बारावीची परिक्षा देत आहेत. त्याचप्रमाणे दहावी बोर्डाच्या परिक्षेसाठी वडवणी परिरक्षक केंद्रांतर्गत एकूण सात परिक्षा केंद्र असून यामध्ये महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी, डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी, छत्रपती राजर्षी शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी, अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचाळा, भगवानबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचवण, मंकावती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचवण आणि सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तेलगांव यांचा समावेश होतो.

## गुणवत्तेत अग्रेसर राहून विद्यार्थीनी शाळेचा नावलौकिक करावा:मुख्याध्यापक शिवदास शेकडे

कडा । प्रतिनिधी

स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल आणि आई,वडिलासह गावासोबत शाळेचे नाव मोठे करायचे असेल तर गुणवत्तेत अग्रेसर राहून विद्यार्थीनी शाळेचा नावलौकिक करावा.असे प्रतिपादन भैरवनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवदास शेकडे यांनी केले.

ते भैरवनाथ विद्यालयातून एनएमएमएस(छचचड) परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या रेणुका मोहन शेकडे,आयान शौकत पठाण या दोन विद्यार्थाच्या सत्कार सोहळ्या प्रसंगी बोलत होते.यावेळी व्यासपीठावर पत्रकार नितीन कांबळे शौकत पठाण यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना ते म्हणाले की,ग्रामीण भागातील शाळा असताना देखील शिक्षकांच्या अभ्यासपूर्ण अध्यापनातून मुलांची शैक्षणिक गुणवत्ता चांगली झाली आहे.या





कठीण परिक्षेत देखील विद्यार्था चमकू लागले आहेत.भविष्यात विद्यार्थी जिल्हा नव्हे राज्य पातळीवर जाऊन शाळेचे नाव मोठ करतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यावेळी भैरवनाथ विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मधुकर तांदळे,मुख्याध्यापक शिवदास शेकडे,सहशिक्षक अशोक तांदळे,बाळासाहेब राजगुरू,किसन शेकडे,कृष्णा शेकडे,प्रवीण तांदळे,दत्ता शिरसाठ, नारायण आंधळे,विश्वनाथ शेकडे, ग्रामपंचायत सदस्य आसमा शौकत पठाण याच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच अरणविहरा, तागडखेल,जोमदार तांड्यासह परिसरातील ग्रामस्थांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

पान ६ वरुन...

### न.प.च्या अर्थसंकल्पीय

फुटमार्केट, स्मशानभूमी, बौद्धविहार आणि डी.पी. रोड प्रस्तावित करण्याची मागणी करण्यात आली. शहर स्वच्छ व हरित ठेवण्यासाठी प्लास्टिकमुक्ती अभियान राबवावे, वृक्षारोपण मोहीम हाती घ्यावी. मोकळ्या जागांमध्ये उद्याने विकसित करावीत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढवून त्याचे सुशोभीकरण करावे, तसेच भिमसृष्टी परिसरात माता रमाई यांचा पुतळा उभारण्याची मागणी करण्यात आली. स्वच्छता व्यवस्थेसाठी जेसीबी, कॉम्पॅक्टर व इतर साधनसामग्री खरेदी करावी, बिंदुसरा नदी सुशोभीकरणासाठी प्रस्ताव पाठवावा. सार्वजनिक शौचालये व मुताऱ्या बांधण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तारांगण प्रकल्पाचे काम सुरू करावे आणि नगरपरिषद इमारतीवर सौरऊर्जा प्रकल्प बसविण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला. महिलांसाठी बेघर निवारागृह सुरू करावे, हद्दवाढ भागात ५०० दिव्यांचे खांब उभारावेत तसेच सार्वजनिक ठिकाणी पाणपोईची सोय करावी, अशी मागणी करण्यात आली. शहरातील वाहतुकीस अडथळा ठरणारे अतिक्रमण तत्काळ हटविण्याबरोबर कर वसुलीसाठी फोन-पे सारख्या डिजिटल प्रणालीवर आधारित ॲप तयार करण्याची सूचना करण्यात आली. याशिवाय यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करावे, अशीही मागणी डॉ.सारिका क्षीरसागर यांनी बैठकीत केली आहे.

### अवकाळी पाऊस व गारपीटीचे

(खूर्द), माकेगाव, कोळकानडी, वरपगांव, लोखंडी सावरगाव यासह अनेक गावांत सोमवारी झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्यासह गारपीट होऊन शेतकऱ्यांच्या रब्बी हंगामातील ज्वारी, हरभरा, गहू पिके तसेच काही ठिकाणी फळभाज्या आणि फळबागेतील आंबा, चिक्कू, द्राक्षे, पपई या फळ पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्यासह गारपीटमुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी अ. भा.मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी निवेदनातून केली आहे. निवेदनावर बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, जहाँगीर पठाण, विलास धुमाळ, दादाहरी केकाण, ओमकार चव्हाण, दयानंद गुजर, सचिन राऊत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### वाळू माफियांना अंभोरा पोलिसांचा

कारवाईदरम्यान दोन हायवा वाहने आणि त्यातील वाळू असा एकूण ३८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पोलीस अंमलदार सतीश पैठणे यांच्या फिर्यादीवरून अंभोरा पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पथकाची धडाकेबाज कामगिरी..

या मोहिमेत पोउनि चंद्रकांत तावरे,पोलीस हवालदार भगवान देवकर, पोलीस अंमलदार सतीश पैठणे,हनुमंत खांडेकर आणि होमगार्ड तुषार वामन यांनी सहभाग घेत कारवाई यशस्वी केली.या धाडीनंतर परिसरातील अवैध वाळू उपसा करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून,पोलिसांनी वाळू माफियांना थेट इशाराच दिला आहे.

### कामे न करताच

कारवाई अटळ आहे. त्या अनुषंगानेच याप्रकरणी गुन्हे दाखल केले जाणार आहेत. ही सर्व कामे वेगवेगळ्या एजन्सीच्या नावावर घेतली असली तरी कामे घेणारा कार्यकर्ता हा सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा पदाधिकारी असल्याने त्याने हे प्रकरण मॅनेज करण्यासाठी मोठी धावपळ केल्याची माहिती आहे. नेत्याला सांगून चौकशी थांबवणे किंवा कारवाई टाळण्यासाठी हा पदाधिकारी प्रयत्नशील असल्याची माहिती आहे.

मंजूर कामात तब्बल ८६ लाख १७ हजार रुपयांची तफावत निघाली आहे. त्यामुळे ही रकम संबंधित कंत्राटदारांकडून वसूल केली जाणार आहे. एवढेच नव्हे तर याप्रकरणी ब्लॅकलिस्टचीही कारवाई केली जाणार आहे.झेडपी बांधकाम विभागातील काही अधिकाऱ्यांनी स्वतःच्या नातेवाईकांनाच कामे दिली आहेत. मोह्यातील या कामात अधिकाऱ्यांचा मोठा हात आहे, त्यामुळेच याचीही चौकसी करून त्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### भाषा व्यक्तीच्या प्रदेशाची ओळख दर्शविते

संभाजी नगर येथील मॉडर्न महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ.सानप हे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र भगत विभाग प्रमुख प्रा हर्षद वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती व्यासपीठावर होती. यावेळी पुढे बोलताना प्राचार्य डॉ.सानप म्हणाले की, मराठी विकासात ज्या ज्ञात अज्ञात थोर महात्म्यांनी, साहित्यीकांनी, अभ्यासकांनी विचारवंतांनी योगदान दिले त्यांचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी भाषांवर प्रभुत्व मिळवून आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी घडवावे असे आवाहन करुन भाषा विकासाची एक महत्वपूर्ण पायरी आहे.असेही डॉ सानप यांनी म्हटले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.भगत यांनी केले. यावेळी प्रा प्रज्ञा किवंडे प्रा उत्कर्षा वाघमारे प्रा नबीया खान यांचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.शेवटी प्रा प्रवीण पावहारे यांनी आभार मानले.

## डी.के.नागवे यांच्या अकॅडमीचे ८ वी एनएमएमएस परिक्षेत ५१ पैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण

वडवणी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात ८ वी छचचड परिक्षेत, डी.के.नागवे सरांच्या अकॅडमीचे ५१ पैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण, तर माने आर्यन गणेश १७९पैकी १५४ विक्रमी गुण घेऊन (प्रथम),मुंडे सुदर्शन रावसाहेब १७९ पैकी १४३ गुण घेऊन (द्वीतीय),यादव शिवम गंगाराम १३५ (तृतीय) त्याचबरोबर,कुरकुटे वैष्णवी रामदास-१३४,शिंदे अक्षद विशालराव-१२६,राठोड सूरज अंकुश-१२३, कीर्तने सोनाली कल्याण-११९,उजगरे साक्षी राजेश-११६, वैष्णवी पेशवे दिलीप-११६,डांबे मैथिली अशोक-११५,अंकुशे अथर्व अनंत-११५,





तिडके पंकजा बालाजी-१११, मोराळे पूजा संतोष-११०, घुमरे अक्षरा अरुण-१०९,मस्के गायत्री गोरख-१०४, तांबडे वेदांत ईश्वर-१०४,मस्के रविराज शंभू-१०४,टिकुळे सीता गणेश-१०१,लोकरे भक्ती देवीदास-१००,गोंडे अरव अंकुश -१००,आंधळे अमर विठ्ठल-९९,शेळके अनंत कोंडीराम-९९,पेशवे आनंद दिलीप-९८,लांडे स्वराज रामप्रभू-९७, मुंडे शैलेश संजय-९६,मस्के किशोरी महामुद्रा-९५,सार्थक चौरे राहुल-९४,लांडे आर्यन कैलास-९२,राठोड पृथ्वीराज शिवाजी-९२,उजगरे श्वेता शत्रुघ्न-९१,केदार शिवम कचरू-९०,लांडे स्वरूपा परमेश्वर-८७,माने सुमित विठ्ठल-८३,केकान प्रतिक्षा महारुद्र-८२,टिकुळे धनंजय रामा-८१,पेशवे आशिष दिलीप-८०,नागवे प्रशांत बिभीषण-७९,माने भक्ती संतोष-७७,मुळे शिवप्रसाद संतोष-७६,राठोड निकिता परमेश्वर-७६, शिंदे ऋषिकेश ज्ञानेश्वर-७५,भांगे पल्लवी अनंत-७३,उजगरे आरोही नितीन -६४, गुण मिळवत उत्तीर्ण झाले आहेत,सर्व उत्तिर्ण विद्यार्थ्यांचे प्रा.डी.के.नागवे सर (संचालक : डी.के.नागवे सर मॅथ्स सायन्स अकॅडमी,वडवणी) व तालुक्यातील शिक्षण प्रेमी नागरीकांच्या वतिन अभिनंदन करुन,पुढील वाटचालीसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## संत भगवान बाबांनी अध्यात्मिक भक्तीचा मळा फुलविला-ह.भ.प. हनुमंत शास्त्री

बीड । प्रतिनिधी

संत भगवानबाबांनी वारकरी संप्रदायाला रंग रूप देण्याचे काम केले. आध्यात्मिक पेरणी करून वारकरी संप्रदायाचा प्रसार आणि प्रचार केला. संत भगवान बाबा यांनी अध्यात्मिक भक्तीचा मळा फुलविला यामुळे अध्यात्मिक क्षेत्रातील कार्याबरोबरच त्यांचे सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. लाखो लोकांना सन्मार्गाचा मार्ग दाखविण्याचे कार्य संत श्रेष्ठ भगवान बाबा यांनी केले.



बीड येथे संत भगवान बाबा प्रतिष्ठान' वर आयोजित अखंड हरीनाम सप्ताहात ह.भ.प.हनुमंत महाराज शास्त्री, मठाधिपती, सालसिद्ध बाबा संस्थान, मिडसांगवी यांनी अभ्यासपूर्ण निरुपण करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी बोलतांना ह.भ.प. हनुमंत महाराज शास्त्री यांनी संतश्रेष्ठ भगवान बाबाच्या कार्याविषयी आपल्या कीर्तनातून अभ्यासपूर्ण निरूपण केले. विविध दृष्टांत देऊन त्यांनी संतश्रेष्ठ वै. भगवानबाबांच्या कार्याची महती सांगितली. भगवान बाबांचे ऐश्वर्यासंपन्न संपन्न व्यक्तिमत्व, पोशाख, याविषयी वैशिष्ट्यपूर्ण शब्दात केलेल्या वर्णनामुळे भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले. आपल्या कीर्तनात त्यांनी प्रारंभी संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या कार्याचा परिहार देऊन डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या भगवानगडावर सुरू असलेल्या संत संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर आणि शास्त्री बाबांच्या कार्याची माहिती दिली.यावेळी मृदंगाचार्य ज्ञानेश्वर माऊली तांदळे, गायनाचार्य ह.भ.प. बंडू महाराज जटाळ, अंगद महाराज सोनवणे, अंगद महाराज मोरे, प्राचार्य त्रंबक महाराज मातकर, नामदेव मुंडे, किसन महाराज माने, मनोज बोठे, श्रीराम महाराज सानप, शेळके महाराज, आश्रुबा सानप, विणेकरी वाल्मीक महाराज चाटे यांनी साथसंगत केली. कीर्तनाचा कार्यक्रम विविध क्षेत्रातील मान्यवर भाविक भक्त, टाळकरी, सप्ताह समितीचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# इंग्रजी शिका, पण मराठी विसरू नका – प्रा. विकास ढोकणे

## आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची ओळख, इतिहासाची साक्ष, संस्कारांची परंपरा आहे. आपण इंग्रजी, हिंदी किंवा इतर भाषा नक्की शिकलो पाहिजे. मात्र आपल्या मराठी भाषेचा सन्मान आणि वापर कधीही कमी होता कामा नये. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा आणि संत गाडगेबाबा यांनी मराठी भाषेतून समाजप्रबोधन केले. ही परंपरा जपणे हीच खरी मराठीची सेवा आहे, असे प्रतिपादन शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव येथील अधिव्याख्याता प्रा. विकास ढोकणे यांनी केले. ते आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे मराठी भाषा गौरव दिन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा आणि संचालक डॉ.



आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जय मराठी, जय महाराष्ट्रच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यांनी मराठी भाषेप्रती आपला अभिमान व्यक्त केला. २७ फेब्रुवारी हा दिवस ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त 'मराठी भाषेचा गौरव आणि साहित्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव येथील अधिव्याख्याता प्रा. विकास ढोकणे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुढे बोलताना प्रा. ढोकणे यांनी मराठी भाषेचा इतिहास, परंपरा, वैभव अधोरेखित केले. सातवाहन राजांची राजधानी प्रतिष्ठान म्हणजे आजचे पैठण होते. त्यांच्या काळात मराठी भाषेचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला, असे त्यांनी सांगितले. पुढे मुकुंदराज, चांगदेव यांनी 'विवेकसिंधू'सारखे ग्रंथ लिहिले. त्यांनी मराठी साहित्य समृद्ध केले, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदित्य पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. राहुल खडके होते. प्रमुख पाहुणे म्हणून आयटीआय महाविद्यालयाचे प्राचार्य वाघ उपस्थित होते. विभागप्रमुख एस. आय. शेख, पी. डी. दुधाळ तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रस्तावना प्रा. अजय दुधाळ यांनी केली. मराठी भाषेचे संवर्धन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. आभार प्रा. दुधाळ यांनी मानले.

**विद्यार्थ्यांची मराठी संवर्धनाची शपथ**

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उपस्थित विद्यार्थ्यांनी दैनंदिन व्यवहारात मराठीचा जास्तीत जास्त वापर करण्याची शपथ घेतली. शुद्ध उच्चाराने मराठी बोलणे, योग्य व्याकरणाचा वापर करणे आणि सोशल मीडियावरही मराठीचा सन्मान राखणे, असा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. मराठी माझी मायबोली, मराठी माझा अभिमान अशी घोषणा देत विद्यार्थ्यांनी मराठी भाषा जपण्याचा संकल्प केला.

## समता सैनिक प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आद.डॉ भिमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांच्या आदेशानुसार गांव तिथे शाखा आणी घर तिथे समता सैनिक निर्माण करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन येथे शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ ते दि.१ मार्च २०२६ या कालावधीत दोन दिवसिय महिला/ पुरुष समता सैनिक दल प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबीरासाठी प्रशिक्षक म्हणुन समता सैनिक दलाचे मेजरजनरल आद.राजाभाऊ आठवले,आद .डॉ एस व्ही बोबडेसर व महिला प्रशिक्षक आद. प्रतिभाताई वाघमारे हे राहणार आहेत तरी तालुक्यातील धम्म उपासक-उपासिका,युवक -युवती यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित आसणारे समता सैनिक निर्माण करण्यासाठी या शिबीरामध्ये सहभागी व्हॉवे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे डॉ भागवत साळवे, मंदाताई साळवे ,तालुका संरक्षण उपाध्यक्ष नितिन डोंगरे, विषाखाताई वाघमारे सह तालुका पदाधिकारी यांच्या कडुन करण्यात येत आहे

# महामार्गाच्या कामात तुटणारे वडाचे झाड रामनगरकरांनी वाचवले अन् जगवलेही!

## अवघ्या एका महिन्यात वडाला फुटली पालवी ; ग्रामस्थांच्या प्रयत्नांना यश

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील रामनगर येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. त्यामुळे सर्व्हिस रोडला अडथळा ठरत असलेले गावातील अनेक वर्षांपासून उभे असलेले भलेमोठे वडाचे झाड तोडण्याची वेळ आली. मात्र रामनगर येथील ग्रामस्थांनी वेळीच सावध भूमिका घेत हे झाड तोडण्यापूर्वीच त्याचे प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेतला होता. ठरल्याप्रमाणे वडाच्या झाडाचे गावातीलच छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे प्रत्यारोपण करण्यात आले. अवघ्या महिन्याभराच्या काळात या वडाला हिरवीगार पालवी फुटली असून वडाचे झाड वाचवले आणि जगवलेही आहे.

कित्येक वर्षे माणसांना सावली देणारे, पक्ष्यांना आसरा देणारे वडाचे झाड महामार्गाच्या कामामुळे तुटणार याचे मोठे दुःख होते. मात्र प्रत्यारोपण करण्याची संकल्पना ग्रामस्थांना सूचली आणि ती प्रत्यक्षात अंमलातही आणण्यात आली. वडाच्या झाडाचे प्रत्यारोपण केल्यानंतर त्याला लवकर पालवी फुटावी, ते जळू नये यासाठी त्याला नियमित पाणी, शेण खत टाकण्यात आले. प्रत्यारोपणानंतर अवघ्या एका महिन्यातच या वडाला नवीन पालवी फुटली आहे. त्यामुळे रामनगरकरांनी केवळ झाड वाचवले नाही, तर ते यशस्वीपणे जगवले असल्याचे स्पष्ट झाले आहे. गावकऱ्यांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण असून, हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. या उपक्रमासाठी ग्रामस्थांसह उड्डाणपुलाचे काम करणारी मे.कालूवाला कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (हरियाणा) कंपनीनेही मोलाचे सहकार्य केल्यामुळे त्यांचेही ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.




## असे करा मक्यावरील लष्करी अळीचे यशस्वी व्यवस्थापन

फॉल आर्मी वर्म (लष्करी अळी) शास्त्रीय नाव स्पोडोप्टेरा फ्रुगीपर्डा ही अमेरिकेत मका पिकावर येणारी महत्वाची कीड आहे. भारतात जून २०१८ मध्ये सर्व प्रथम दक्षिण कर्नाटकातील काही जिल्ह्यांमध्ये या किडीची नोंद झाली. महाराष्ट्रात देखील मागील दोन वर्षापासून ही कीड मका, मधुमका, ज्वारी, बाजरी, भात ही तृणधान्य पिके तसेच कापूस, सोयाबीन, ऊस या पिकांना देखील मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव करतांना आढळते आहे.सदर कीड बहुभक्षी असून ८० पेक्षा जास्त वनस्पतींवर उपजिविका करते. परिणामी सर्वच हंगामामध्ये किडीसाठी यजमान वनस्पती सहजपणे उपलब्ध होत असल्याकारणाने सदर किडीचे व्यवस्थापन करतांना काळजी घेण्याची गरज आहे.

प्रवास क्षमता : या किडीचा पतंग एका रात्रीत सुमारे १०० कि. मी.पर्यंत तर वाऱ्याचा वेग अनुकूल राहिल्यास ३० तासात १६०० कि. मी.पर्यंत गेल्याची नोंद आहे. यामुळे दुर्गम भागातील मका पिक शोधून तिथेही सहजपणे अंडी घालू शकत असल्याने जवळपास सर्वच जिल्ह्यात मका पिकावर या किडीचा प्रादूर्भाव दिसून येत आहे.

प्रजनन क्षमता : या किडीचे जीवनक्रम वर्षभर चालू असते. सदर किडीची प्रजनन क्षमता प्रचंड असून मादी तिच्या जीवनक्रमात सुमारे १ ते २ हजार अंडी घालते व त्यामुळे अल्पावधीतच किडीच्या संख्येत प्रचंड वाढ होते.

नुकसानीचा प्रकार : लष्करी अळीचा प्रादूर्भाव मका पिकावर सर्वच अवस्थांमध्ये आढळून येतो. अळ्या सुरुवातीस समुहाने राहतात पानांचा पृष्ठभाग खरबडून खातात. पहिल्या व दुसऱ्या अवस्थेतील अळ्यांनी पानांचा हिरवा पापुद्रा खाल्ल्यामुळे पांढरे चट्टे पडल्याचे दिसते. मोठ्या झाल्यावर अळ्या वेगवेगळ्या होतात. ही कीड स्वजातीय भक्षक असल्यामुळे एका पोग्यांत एक किंवा दोनच अळ्या आढळून येतात. तिसऱ्या अवस्थेतील अळ्या पोंग्यामध्ये शिरून पाने खायला सुरुवात करतात. त्यामुळे पोग्यांतून बाहेर आलेल्या पानांवर एकारेषेत



एकसमान छिद्रे दिसून येतात. पाचव्या अवस्थेतील अळी पोग्यामंध्ये राहून पाने खात असल्याने मोठ्या आकाराची छिद्रे दिसतात. सहाव्या अवस्थेतील अळी अतिशय खादाड असून अधाशीपणे पाने खाते व पोग्यामंध्ये मोठ्या प्रमाणात विष्टा टाकलेली आढळते या अवस्थेत मक्याची पाने झडल्यासारखी दिसतात. बऱ्याच वेळा अळी कणसाच्या बाजूने आवरणास छिद्रे करून आतील दाणे देखील खाते.

पिक अवस्थेनुरूप करावयाचे व्यवस्थापन : मका पिक शेवटची पोंग्यांची अवस्था ते तुरा अवस्थेत असल्याने त्वरित उपाययोजना केल्यास लष्करी अळीमुळे होणारे नुकसान टाळता येईल.सर्वेक्षण :पिकाचे आठवड्यातून दोन वेळा नियमित सर्वेक्षण केल्यास वेळीच अळीचा प्रादूर्भाव ओळखणे शक्य होते. त्याकरिता प्रत्यक्ष शेताचे निरीक्षण करतांना शेतात नागमोडी किंवा इंग्रजी अक्षरासारखे फिरून पाच ठिकाणे व प्रत्येक २० झाडे किंवा दहा ठिकाणे व १० झाडे निवडावीत. प्रादूर्भावग्रस्त झाडांची टक्केवारी काढण्यास एकरी एवढे पुरेसे आहे. समजा २० झाडांपैकी २ झाडे प्रादुर्भावीत असतील तर नुकसान पातळी १० टक्के आहे असे समजावे व अर्थिक नुकसान संकेत पातळी लक्षात घेऊन त्वरित उपाययोजना कराव्यात.

प्रत्यक्ष शेताचे निरीक्षण : मध्यम पोंग्यांची अवस्थेमध्ये (उगवणीनंतर ५ ते ६ आठवडे) १० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे दिसून येताच त्वरित उपाययोजना करावी. शेवटची पोंग्याची अवस्थेमध्ये (उगवणीनंतर ७ आठवडे) २० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे दिसून येताच त्वरीत उपाययोजना करावी. तर तुर्याच्या अवस्थेमध्ये (उगवणीनंतर ८ आठवडे) फवारणी टाळावी मात्र १० टक्के प्रादुर्भावग्रस्त कणसे असल्यास फवारणी करावी.

## कोथिंबीरीपेक्षा धण्यात जास्त नफा, अशी करा लागवड

मसाला बियाण्यांच्या पिकांमध्ये मेथी, सोप, धणे, शेपू, ओवा, जिरे, सोवा, काळेजिरे, अनिसे, कसुरी मेथी ही काही महत्वाची मसाला बियाणे पिके आहेत. भारतात जवळपास १९ मसाला बिया पिके घेतली जातात. परंतु तुलनात्मकदृष्ट्या त्यांचे क्षेत्र कमी असल्याने ही दुय्यम पिकात मोडली जातात. वरील मसाला बियाणे पिकातील धणे हे महत्वाचे पीक असून ॲपिअसी कुटुंबातील आहे. धणे किंवा कोथींबीर या पिकांना भारतात व भारताबाहेर वर्षभर मागणी असते. याच्या पानांचा (कोथंबीर) वापर जेवणात किंवा जेवणाच्या थाळीचे सौंदर्य वाढविण्यासाठी तसेच चवीमध्ये वेगळेपणा आणण्यासाठी केला जातो.

धणे हे पीक उष्णकटीबंधीय प्रदेशात येते. धण्याच्या उत्पादनासाठी पीक फुलावर असताना वातावरण कोरडे व थंड असणे गरजेचे आहे. या पिकाच्या लागवडीकरिता कुठल्याही प्रकारची जमीन चालते. परंतु कोरडवाहु पिक पद्धतीमध्ये हे पिक फक्त भारी जमिनीत घेणे फायद्याचे ठरते. कारण फुलोरावस्थेत पाणी धरून ठेवणारी व उपलब्ध करून देणारी जमिनच या पिकाकरिता निवडणे गरजेचे आहे.

धणे पिकासाठी महत्वाच्या जाती : धणे पिकाच्या अधिक उत्पादनाकरिता राष्ट्रीय मसाला बियाणे संशोधन केंद्र, अजमेर, राजस्थान या केंद्र शासनाच्या अधिनस्त असणाऱ्या संस्थेने आणि भारतातील कृषि विद्यापीठांनी खालील जातीचे प्रसारण केले आहे.

एसीआर - १ : ही राष्ट्रीय मसाला बियाणे संशोधन संस्था, अजमेर येथून २००६ मध्ये प्रसारीत केलेली जात आहे. ही जात कोथींबीरीची पाने व धणे निर्मीतीकरीता वापरता येते. धण्याचे बी गोलाकार असून मध्यम आकाराचे आहे. या बियामध्ये ०.५ ते ०.६ टक्के तेलाचे प्रमाण आढळून आले. भुरी व काळा दाणा या रोगास प्रतिबंधक आहे.

आरसीआर - ४३६ : कृषी महाविद्यालय, जोबनेर, राजस्थान यांच्याकडून १९९५ मध्ये निवड पद्धतीने विकसित केलेली जात आहे. ही कोरडवाहू पध्दतीने लागवडीस योग्य जात आहे. १००० दाण्याचे वजन १० ते १३ ग्रॅम असून लवकर तयार होणारा (९०-११० दिवस) वाण आहे. हेक्टरी १४ ते १६ क्विंटल उत्पादन देणारा वाण म्हणून प्रसिध्द आहे.

जीसीआर - २ : जागुदान (गुजरात) येथील अखिल भारतीय समन्वयीत मसाला बियाणे संशोधन प्रकल्पातून २००७ मध्ये निवड पध्दतीने ही जात प्रसारित करण्यात आली आहे. कोरडवाहू पिक परिस्थितीत लवकर लागवडीकरिता (ऑक्टोबर-नोव्हेंबर) ही अतिशय महत्वाची जात आहे. साधारणपणे ११०-११५ दिवसात तयार होणारी आणि हेक्टरी १४ ते १६ क्विंटल उत्पन्न देणारी जात आहे.

धणे लागवडीसाठी बिजप्रक्रिया महत्वाची : धणे लागवडीकरिता लागणारे बियाणे, जमिनीचा प्रकार, बियाण्याचा आकार, लागवडी वेळी जमिनीतील ओलाव्याचे प्रमाण (ओलित किंवा कोरडवाहू क्षेत्र) यावर अवलंबुन असते. ओलितासाठी १०-१२ किलो प्रति हेक्टरी आणि कोरडवाहू क्षेत्रासाठी २० किलो प्रति हेक्टरी याप्रमाणे बियाणे लागते. लागवडीपूर्वी धने बियाण्यास रगडून घेऊन बियाण्याचे दोन भाग होतील ही काळजी घ्यावी. यानंतर थायरम २ ग्रॅम प्रती किलो बियाणे + ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा प्रति किलो बियाणे चोळून घ्यावे.

धणे लागवडीची पध्दत : सर्वसाधारणपणे धणे उत्पादन करण्यासाठी या पिकाचा कालावधी १२० ते १३० दिवस असल्याने या पिकाची लागवड पेरीव पध्दतीने करावी. त्यासाठी दोन ओळीतील अंतर ६० से. मी. (जमीनीचा मगदूर बघून) ठेवावी. भारी जमिन असल्यास हे अंतर ७५ से.मी. पर्यंत ठेवावे. टोकण पद्धतीने धणे लागवड करता येते, त्यासाठी दोन ओळीतील अंतर ६० सें.मी.; दोन झाडातील अंतर ४५ सें. मी. ठेवावे. लागवड करताना खोली २.५ से.मी. पेक्षा जास्त ठेवू नये.

धणे पिकासाठी पाणी व्यवस्थापन : ओलिताखालील धणे लागवडीसाठी भारी जमिनीत ३ ओलीत आणि हलक्या जमिनीत ५ ते ६ ओलिताची गरज आहे. परंतु फुलोरावस्था, बिजधारणा अवस्थेत पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी.

धणे पिकासाठी खत व्यवस्थापन : धणे हे पिक खत व्यवस्थापनास अतिशय चांगला प्रतिसाद देते. लागवडीपूर्वी २० टन चांगले कुंजलेले शेणखत प्रति हेक्टरी द्यावे. सोबतच रासायनिक खतांची ६०:३०:३० क्विंटल नत्र, स्फुरद आणि पालाश प्रति हेक्टरी शिफारस करण्यात आलेली आहे. अर्धा नत्र आणि पूर्ण स्फुरद व पालाश ही खते फुलोरावस्थेत द्यावी. उर्वरित अर्धा नत्र धण्याची दुधाळ अवस्था असताना द्यावा.



## असे करा डाळिंबावरील तेल्या रोगाचे व्यवस्थापन

डाळिंबावरील बॅक्टेरीयल ब्लाईट रोग म्हणजेच तेल्या हा प्रामुख्याने जिवाणूजन्य असून झॅन्थोमोनास एक्झानोपोडीस पीव्ही पुनीकिया जिवाणूमुळे होतो. या रोगास अनु जीव जन्य करपा असे म्हणतात. महाराष्ट्रात या रोगाचा शिरकाव रोगग्रस्त कलमांद्वारे झालेला असून या रोगाचा प्रादुर्भाव सर्वप्रथम कर्नाटक राज्याच्या सीमेलगतचा भागात डाळिंबाच्या रुबि या जातीवर सर्वप्रथम दिसून आला. या रोगामुळे डाळिंबावर तेलकट डाग पडतात. याचा प्रादुर्भाव पाने, फुले खोड आणि फळांवर होतो. पान :सुरुवातीस पानावर लहान तेलकट किंवा पाणथळ डाग दिसतात. कालांतराने काळपट होतात व डागा भोवती पिवळे वलय दिसते. तसेच ते मोठे होऊन तपकिरी ते काळे रंगाचे होतात. उन्हात हे डाग बघितले की तेलासारखे चमकतात. डाग मोठा झाल्यावर पाने पिवळी पडून गळून पडतात. फुल :फुलांवर व कळ्यांवर गर्द तपकिरी व काळपट डाग पडतात. पुढे यामुळे फुलांची व फळांची गळ होते. खोड व फांद्यावर :प्रामुख्याने खोडावर व फांद्यांवर सुरुवातीला काळपट किंवा तेलकट डाग गोलाकार दिसतात. खोडावर या डागाणे गर्द लिंग किंवा खाच तयार होते व तेथून झाड मोडते. तसेच फांद्यांवर डागांची तीव्रता वाढल्यावर फांद्या डागा पासून मोडतात.

फळे :फळावर सुरुवातीला एकदम लहान आकाराचे पाणथळ तेलकट डाग दिसतात.कालांतराने हे डाग तपकिरी काळपट दिसतात व त्यावर भेगा पडतात. फळांवर लहान डाग एकत्र आले की मोठ्या डागात रूपांतर होते. फळांवर या डागांमुळे आडवे उभे तडे जातात. फळांची प्रत पूर्णपणे खराब होते व तडे मोठे झाल्यावर फळे सडतात आणि गळून पडतात. रोगासाठी कोणत्या बाबी अनुकूल ठरतात : या रोगाच्या जिवाणूंची वाढ २८ ते ३२ अंश सेल्सिअस तापमान तसेच वातावरणातील आद्रता ८० टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास झपाट्याने होते. बागेत किंवा बागेत शेजारी तेलकट डाग रोगाच्या अवशेष असणे. बागेत स्वच्छता असणे म्हणजे तणांचे मोठ्या प्रमाणावर वाढ असणे. ढगाळ व पावसाळी हवामान, वादळी पाऊस आणि वातावरणातील आर्द्रता जास्त असणे. रोगग्रस्त बागेतील गुटी कलमांचा वापर.

या रोगाचा प्रसार कसा होतो? याचा प्रसार प्रामुख्याने बॅक्टेरीयल ब्लाईट ग्रस्त मातृ वृक्षापासून बनविलेल्या रोपाद्वारे होतो. याशिवाय रोगट डागां वरून उडणारे पावसाचे थेंब, पाट पद्धतीने दिलेले ओलिताचे पाणी, निर्जंतुकीकरण करता वापरण्यात येणारी छाटणीची अवजारे, शेत मजूरांचे आवागमन तसेच विविध कीटक आधारे या रोगाचा प्रसार होतो.

तेल्या रोगाचे एकात्मिक रोग नियंत्रण : रोप कॅल्शियम हायड्रोक्लोराइड निर्जंतुक केलेल्या खड्ड्यात लावावे.

रोपांची लागवड कमीत कमी साडेचार मीटर बाय ३० मीटर अंतरावर करावी आणि प्रत्येक ठिकाणी तीन खोड ठेवावी. स्वच्छता मोहीम काळजीपूर्वक राबवावी. खाली जमिनीवर पडलेली पाने गोळा करून नष्ट करावेत. बहार धरताना जमिनीवरील रोगट जिवाणूंची संख्या कमी करण्यासाठी ब्लिचिंग पावडर दीडशे ग्रॅम प्रति पाच ते सहा लिटर पाण्यात मिसळून झाडाखाली भिजवन करावी किंवा झाडाखाली भुकटी हेक्टरी २० किलो धुरळावि. फळे काढणी पावसाळ्यात झाली असेल तर ब्रोनोपोल ५०० पीपीएम फवारावे. (ब्रोमोपोल ५० ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात) संपूर्ण फळे काढणी झाल्यानंतर बागेला तीन महिने विश्रांती घ्यावी. बहार घेण्यापूर्वी संपूर्ण पानगळ करून घ्यावी तसेच रोगट फांद्यांची छाटणी करावी. खाली पडलेली संपूर्ण पाने व छाटलेली रोगट अवशेष गोळा करून जाळून टाकावीत.छाटणी करताना कात्री प्रत्येक वेळी एक टक्का डेटॉल च्या द्रावणात निर्जंतुक करून घ्यावी.






### जागतिक दिवस
### राष्ट्रीय विज्ञान दिवस

### महत्वाच्या घटना

१८४७: अमेरिकेने सकरामेंटो च्या युद्धात मेक्सिको ला हरविले.
१८४९: अमेरिकेच्या पूर्व आणि पश्चिम किनार्यांमध्ये नियमित जहाजसेवा सुरू झाली. न्यूयॉर्कहुन निघालेले एस. एस. कॅलिफोर्निया हे जहाज ४ महिने व २१ दिवसांनी सॅनफ्रान्सिस्कोला पोहोचले.
१९२२: इजिप्तला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९२८: डॉ. सी. व्ही. रामन यांनी भौतिकशास्त्रातील एका परिणामाचा शोध लावला. त्याला रामन इफेक्ट असे नाव देण्यात आले. यामुळे हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणुन साजरा करण्यात येतो.
१९३५: वॅलेस कॅरोथर्स या शास्त्रज्ञाने नायलॉनचा शोध लावला.
१९९५: आजच्या दिवशी अमेरिकेच्या कॉलरेडो येथील डेनवर आंतराष्ट्रीय विमानतळाची सुरुवात.
१९४०: बास्केटबॉल खेळ प्रथमच टेलेव्हिजन वर प्रक्षेपित झाला.
२०११: ''द किंग्स स्पीच'' या हॉलीवूड चित्रपटाला ऑस्कर पुरस्कार मिळाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७३: सर जॉन सायमन स्वातंत्र्यपूर्व काळात भारताला राजकीय सुधारणा देण्यासाठी नेमलेल्या 'सायमन कमिशन' या आयोगाचे अध्यक्ष. क्लेमंट ॲटली हे देखील या आयोगाचे एक सदस्य होते, जे पुढे इंग्लंडचे पंतप्रधान झाले. (मृत्यू: ११ जानेवारी १९५४)
१८९७: डॉ. शंकर दामोदर पेंडसे मराठी ग्रंथकार आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक. पंढरपूर येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे (१९५५) ते अध्यक्ष होते. (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७४)
१९०१: लिनस कार्ल पॉलिंग रसायनशास्त्रज्ञ आणि अण्वस्त्रांच्या विरोधात लढणारे सामाजिक कार्यकर्ते, नोबेल पारितोषिकाचे दोनदा विजेते १९५४ रसायनशास्त्र, १९६२ शांतता (मृत्यू: १९ ऑगस्ट)
१९१३: हिंदी भाषेचे प्रसिद्ध लेखक नरेंद्र शर्मा यांचा जन्म.
१९२७: कृष्णकांत भारताचे १० वे उपराष्ट्रपती (मृत्यू: २७ जुलै २००२)
१९२९: भारतीय-अमेरिकन संशोधन रंगास्वामी श्रीनिवासन यांचा जन्म.
१९४२: ब्रायन जोन्स 'द रोलिंग स्टोन्स'चे संस्थापक, गिटार, हार्मोनिका आणि पियानो वादक (मृत्यू: ३ जुलै १९६९)
१९४४: रविन्द्र जैन संगीतकार व गीतकार
१९४७: मध्य प्रदेश चे माजी मुख्यमंत्री विजय बहुगुणा यांचा जन्म.
१९४७: मध्य प्रदेश चे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांचा जन्म.
१९४८: विदुषी पद्मा तळवलकर ग्वाल्हेर/किराणा/जयपूर घराण्याच्या ख्याल गायिका
१९५१: करसन घावरी भारतीय क्रिकेटपटू
१९६८: मराठी चित्रपट अभिनेत्री वर्षा उसगावकर यांचा जन्म.
१९६८: प्रसिद्ध हिंदी लेखक हुसैन जैदी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५७२: महाराणा प्रताप यांचे वडील राणा उदयसिंह यांचे निधन.
१९२६: स्वातंत्र्यशाहीर गोविंद त्र्यंबक दरेकर उर्फ कवी गोविंद यांचे निधन लहानपणीच तापामुळे कमरेखालील सर्व अंग लुळे पडून त्यांना कायमचे अपंगत्व आले, त्यामुळे त्यांचे शिक्षणही होऊ शकले नाही. कविता मात्र बालपणापासून करीत होते. स्वातंत्रवीर सावरकरांशी निकटचे संबंध आल्यानंतर त्यांच्या कवितेला उत्कट राष्ट्रभक्तीची आणि तीव्र स्वातंत्र्याकांक्षेची दिशा गवसली. (जन्म: ९ फेब्रुवारी १८७४ नाशिक)
१९३६: कमला नेहरू पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पत्नी पुण्यतिथि (जन्म: १ ऑगस्ट १८९९)
१९६३: डॉ. राजेन्द्र प्रसाद भारताचे पहिले राष्ट्रपती (जन्म: ३ डिसेंबर १८८४)
१९६६: उदयशंकर भट्ट आधुनिक हिंदी नाटककार, एकांकिकाकार, कवी आणि कादंबरीकार. त्यांनी पंजाब विद्यापीठातून 'शास्त्री' आणि कलकत्ता विद्यापीठातून 'काव्यतीर्थ' या उपाध्या मिळवल्या.
१९६७: टाईम मॅगझिन चे सहसंस्थापक हेन्री लूस यांचे निधन. (जन्म: ३ एप्रिल १८९८)
१९८०: भारताचे राजनीति तज्ञ पंडित के. संतानम यांचे निधन.
१९८६: स्वीडनचे २६ वे पंतप्रधान ओलोफ पाल्मे यांची हत्या. (जन्म: ३० जानेवारी १९२७)
१९९५: कृष्ण गंगाधर दिक्षीत ऊर्फ कवी संजीव 'सासरमाहेर', 'भाऊबीज', 'चाळ माझ्या पायांत' या चित्रपटांचे त्यांनी कथा, संवाद व गीतलेखन केले होते.
१९९८: राजा गोसावी अभिनेता यांचे निधन
१९९९: भगवंतराव श्रीपतराव पंतप्रतिनिधी औध संस्थानचे राजे )

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# दोन आठवड्यांत जॅकवेलमधून २०० एमएलडी पाणी उपसा होऊ शकतो सुरू

## संभाजीनगर मनपा आयुक्तांची उच्च न्यायालयात ग्वाही, ८० टक्के शहराला २ दिवसांआड पाणीपुरवठा शक्य

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

पुढील दोन आठवड्यांत जॅकवेलमधून २०० एमएलडी पाणी उपसा सुरू होऊ शकतो. त्यापैकी १७६ एमएलडी पाणी महापालिकेला मिळेल. त्यातून ८० टक्के शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा करता येईल, असे निवेदन मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी मुंबई उच्च न्यायालयातील सुनावणीवेळी केले. त्यावर ''मनपा आयुक्तांनी ६ मार्च रोजी एमजेपीचे मुख्य अभियंता, कंत्राटदार, संबंधितांना सोबत घेऊन पुन्हा जॅकवेलला भेट द्यावी. वरील कामाबाबत त्यांनी सादर केलेल्या अहवालापैकी किती कामे पूर्ण झाली याचा आढावा घ्यावा. त्याचा अहवाल (शॉर्ट नोट) तयार करावा. जॅकवेलमधून पाणी उपशासाठी कशाची आवश्यकता आहे, ते नमूद करावे,' असा आदेश खंडपीठाने दिला. संबंधित सर्वांच्या विनंतीवरून न्यायमूर्तीद्वयांनी ८ मार्च रोजी जॅकवेलच्या प्रत्यक्ष पाहणीस सहमती दर्शवली. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्यासमोर याचिकेची सुनावणी सुरू आहे.

२६ एमएलडीच्या पाणी प्रक्रिया केंद्राचे काम पूर्ण झाले आहे. अतिरिक्त खर्च करण्यात आला आहे. नोव्हेंबरपर्यंत सर्व चाचण्या यशस्वी झाल्याचे या प्रकल्पाचे काम करणाऱ्या कंत्राटदार कंपनीच्या वतीने उच्च न्यायालयात सांगण्यात आले. प्रकल्पाची हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचे निदर्शनास आणून दिले. अतिरिक्त मनुष्यबळ वापरून काम पूर्ण केले आहे. साडेचार कोटी



रुपयांचे बिल प्रलंबित असल्याचे ॲड. सुजित कार्लेकर यांनी उच्च न्यायालयात सांगितले.

कामासंबंधी कंत्राटदार कंपन्या व शासकीय विभागांमध्ये मतमतांतरे आहेत. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीद्वयांनीच आता स्वतः पाणी पुरवठा योजनेची पाहणी करावी, अशी विनंती सर्व विभागांच्या वतीने करण्यात आली आहे. वीजपुरवठ्यासाठी महावितरणसोबत करार झाला आहे. १-२ दिवसांत वीज मिळणे अपेक्षित आहे. थ्रस्ट ब्लॉक आणि बटरफ्लाय व्हॉल्व्हला आधार देण्याचे काम सुरू आहे. पाइपलाइन शेड्युल : एकूण १७९ चेअर्सपैकी ७३ चांगल्या स्थितीत आहेत. उर्वरित ठिकाणी किरकोळ किंवा मोठी दुरुस्ती आवश्यक आहे. जॅकवेल स्वच्छता : महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाने आधुनिक उपकरणांद्वारे जॅकवेलच्या तळाची स्वच्छता पूर्ण केली आहे. गळती आणि दुरुस्ती : भिंतींमधील बहुतेक गळती थांबवण्यात आली आहे. उर्वरित किरकोळ कामे प्रगतिपथावर आहेत. भिंतींमधील लोखंडी सळया कापण्याचे काम अग्निशमन दलाच्या शिडीच्या मदतीने सुरू आहे. जिना आणि रेलिंग : सेक्शन ''ए' मधील जिन्याचे काम अपूर्ण आहे. ते असुरक्षित आहे. सेक्शन बी, सीचे काम प्रगतिपथावर आहे. आयुक्त जॅकवेलमधील लोखंडी साहित्य, प्लायवूड व कचरा त्वरित काढणे आवश्यक आहे. अन्यथा पंपिंग सुरू झाल्यावर अडथळे येऊ शकतात. सध्या कामावर फक्त २० मजूर आहेत. ही संख्या वाढवणे आवश्यक आहे. पाणी उपसा सुरू करण्यापूर्वी जीव्हीपीआर, इलेक्ट्रो-मेकॅनिकल कंत्राटदार व मजीप्राकडून सुरक्षितता प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. नक्षत्रवाडी जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी पोहोचण्यासाठी साधारण ३ ते ४ आठवडे लागतील. हा प्रकल्प ३९२ एमएलडीपर्यंत पूर्ण क्षमतेने कार्यरत होऊन प्रत्येक घरापर्यंत नळ जोडणी मिळेपर्यंत पूर्ण मानला जाऊ नये, अशी विनंती आयुक्तांनी केली.

## थोडक्यात



### श्रुती भगसचे सी.एस.परिक्षेत यश

जालना । प्रतिनिधी

आय.सी.एस.आय. इन्स्टिट्यूट मुंबई तर्फे कंपनी सेक्रेटरी ( सी.एस.) पदासाठी घेण्यात आलेल्या एक्झिटिव्ह एक्झाम परिक्षेत श्रुती राजेंद्र भगस हिने घवघवीत यश संपादन केले आहे.ती जे.ई.एस.महाविद्यालयात बी.कॉम च्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहे.या यशाबद्दल शृती चे पालकांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

### पद्मश्री पोपेरे यांना राज्य परिवहनचा सवलत एसटी पास प्रदान

अकोले। प्रतिनिधी

तालुक्यातील पोपेरेवाडी (कोभांळणे) येथील गावरान बी-बियाणे संवर्धन करणाऱ्या शेतकरी बिजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांना महाराष्ट्र राज्य परिवहन कार्यालयाने विनामोबदला सवलतीच्या दारातील एसटी पास आदा केला. अकोल्याचे आगरप्रमुख सुरेश दराडे यांनी बिजमाता पद्मश्री पोपेरे यांना आदिवासी विकास विभागाकडून विशेष प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर हा पास प्रदान केला. अकोले आगरात आगर व्यवस्थापक सुरेश दराडे यांच्या हस्ते छोटेखानी कार्यक्रमात या पासचे वितरण बिजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांना करण्यात आले. विनामोबदला पासचा उपयोग करून त्या राज्याअंतर्गत ठिकठिकाणांहून कार्यक्रमांसाठी उपस्थित राहू शकतील. राहीबाई यांच्या या पासवर त्यांच्यासह एका व्यक्तीस विनामोबदला प्रवास करता येणार आहे. या सुविधेसाठी त्यांच्या कार्याची नोंद आदिवासी विकास विभागाकडून घेऊन त्यांना विशेष प्रमाणपत्र प्राप्त झाल्याने मोफत प्रवास पास दिल्याचे आगारप्रमुख दराडे यांनी स्पष्ट केले.

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक; बाजारपेठेत वजन मापांत तफावत





जालना। प्रतिनिधी

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची महत्त्वपूर्ण बैठक शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात पार पडली. आयोजित केलेल्या या बैठकीत ग्राहकांच्या विविध तक्रारी आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर आणि अशासकीय सदस्य सतिश पंच यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी जिल्ह्यातील बाजारपेठांमधील वाढती भेसळ, वजन-मापांमधील तफावत आणि सेवांमधील त्रुटींबाबत सदस्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. अशासकीय सदस्यांनी केलेल्या सुचनांवर अंमलबजावणी करावी तसेच ग्राहकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश अपर जिल्हाधिकारी मिसाळ यांनी यावेळी दिले. बैठकीला समितीचे इतर शासकीय व अशासकीय सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्राहकांनी आपल्या तक्रारींसाठी पुढे यावे, असे आवाहनही याप्रसंगी करण्यात आले.

## किसनराव मोरे यांची शिवसेना (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुखपदी नियुक्ती

मंठा । प्रतिनिधी

मंठा पंचायत समितीचे माजी उपसभापती किसनराव मोरे यांची शिवसेना (शिंदे गट)च्या जालना उपजिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीसाठी माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर, आमदार हिकमत दादा उढाण, जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आग्रही मागणी केली होती. मुंबई येथे (ता.२६) रोजी राज्याचे मंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते श्री मोरे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी आमदार हिकमत दादा उढाण, शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे, बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे, सुदर्शन सोळंके, तुळशीराम कुहिरे यांची उपस्थिती



होती.किसनराव मोरे यांनी मंठा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि पंचायत समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे व जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले. श्री मोरे यांना उपजिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी पक्षश्रेष्ठींकडून देण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील शिवसेनेला निश्चितच बळकटी मिळणार आहे. या निवडीमुळे शिवसेना (शिंदे गट) मध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीमध्ये शिवसेनेचे जास्तीत जास्त सदस्य निवडून आणण्यासाठी आपण प्रयत्न करणार असे नूतन उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे यांनी सांगितले

## हिंगोलीच्या ब्रम्हपूरी नदीघाटातून अवैध वाळू वाहतूक; ५.७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली तालुक्यातील ब्रम्हपुरी शिवारातील नदीघाटातून पोलिसांच्या पथकाने अवैध वाळू उपसा करून वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडले आहे. या प्रकरणी नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात शुक्रवारी ता. २७ गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी ट्रॅक्टरसह ५.७५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

हिंगोली जिल्हाभरात महसूल विभाग व पोलिस विभागाने वाळू घाटांवरून होणारा अवैध वाळू उपसा व वाहतूक रोखण्यासाठी युध्दपातळीवर मोहिम हाती घेतली आहे. त्यासाठी पोलिस अधिक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधिक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनासाठी पथके स्थापन केली आहेत. या पथकाच्या माध्यमातून दररोज सकाळी व रात्रीच्या वेळी वाळू घाटांवर तपासणी केली जात आहे. या शिवाय वाहनांची तपासणी केली जात आहे. मागील आठ दिवसांत पोलिसांनी १० पेक्षा अधिक वाहनांवर कारवाई करून हि वाहने जप्त केली आहेत. दरम्यान, हिंगोली तालुक्यातील ब्रम्हपुरी शिवारात नदीघाटातून वाळूचा अवैध उपसा करून वाहतूक करण्यासाठी ट्रॅक्टर आल्याची माहिती नर्सी नामदेव पोलिसांना मिळाली होती. त्यावरून सहाय्यक पोलिस निरीक्षक अशोक घारगे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक डी. के. दिघाडे, राठोड, जमादार खंडेराव नरोटे यांच्या पथकाने गुरुवारी ता. २६ रात्री घटनास्थळी जाऊन पाहणी केली. यावेळी त्या ठिकाणी एक ट्रॅक्टर व त्यात वाळू भरलेले दिसून आले. पोलिसांनी त्या ठिकाणी असलेल्या दत्ता इंगोले याच्याकडे चौकशी केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी ट्रॅक्टर व वाळू असा ५.७५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दत्ता इंगोले (रा. जवळा बुद्रूक ता. सेनगाव) याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दिघाडे पुढील तपास करीत आहेत.

## सुसंस्कारित मुलं हीच खरी संपत्ती-डॉ. विजयकुमार फड

जालना। प्रतिनिधी

मानवी जीवन हे ईश्वराची, निसर्गाची अत्यंत सुरेख देणगी आहे. या देहाची खरी महती त्याच्या चांगुलपणावर अवलंबून असते. त्याची मुले किती सुसंस्कारित निघतात यावरही ती अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येकाने आपली खरी संपत्ती असणारी मुले सुसंस्कारित करण्याचा स्वआचार-विचारातून प्रयत्न करायला हवा, असे प्रतिपादन डॉ. विजयकुमार फड यांनी केले. रोहिलागड जिल्हा परिषद प्रा. शाळेतील मुलांना तसेच पालकांना मार्गदर्शन कार्यक्रमप्रसंगी डॉ. फड बोलत होते.

याप्रसंगी कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका सविता राजपूत, नामदेव गंगावणे, बाळासाहेब टकले, बाप्पासाहेब अजिनाथ, अप्पासाहेब टकले, शिंदे महाराज माऊली, नंदू पाटील, नारायण टकले, गणेश डहाळे, दादासाहेब होलगे आदी उपस्थित होते. डॉ. फड यांनी आई-वडिलांचे खरे हित त्यांच्या मुलांचे चांगले घडण्यात असते, असे सांगितले. मुले हीच खरी संपत्ती असते, असेही त्यांनी नमूद केले. मुले केवळ मोठ्या शहरात, मोठ्या महाविद्यालयात गेल्याने चांगली घडत नाहीत. चार-दोन खासगी शिकवण्या लावल्यानेही ती चांगली घडत नाहीत. त्यांच्यावर घरात होणारे संस्कार महत्त्वाचे असतात. तुकाराम महाराजांच्या, ''कन्या पुत्र होती जी सात्विक। तयाचा हरिख वाटे देवा।।'' या अभंगाप्रमाणे कन्या आणि पुत्रात फरक न करता मुलांची सात्त्विकता वाढेल, असे पालकांनी पाहायला हवे, असे फड म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुलांनी गीतेचा १२ वा अध्याय मुखोद्गत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. याबद्दल डॉ. फड यांनी कौतुक केले. याप्रसंगी फड यांनी गुरुजनांनाही मार्गदर्शन केले. पालकांनी या कार्यक्रमातून प्रेरणा मिळाल्याने शालेय समितीचे आभार मानले.

मुले आई-वडिलांच्या कृतीचे करतात अनुकरण

मुले आई-वडिलांची, वडीलधाऱ्यांची, गुरुजनांची कृती पाहून त्याचे अनुकरण करीत असतात. म्हणून पालकांनी, गुरुजनांनी ''आधी केले, मग सांगितले'' असे वागले पाहिजे, असेही ते म्हणाले. ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा तसेच अनेक संतवचनांचा आधार घेत फड यांनी मार्गदर्शन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद या पदावरील काही शैक्षणिक अनुभवही त्यांनी सांगितले. मुलांनी यावेळी डॉ. फड यांना काही प्रश्न विचारले. फड यांनी अत्यंत सोप्या भाषेत त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

## राष्ट्रीय महामार्गावर ट्रकने दुचाकीला धडक; पत्नी ठार, पती गंभीर जखमी

वाशी। प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्ग ५२ वरील कान्हेरी पाटी येथे बुधवारी रात्री सव्वा दहाचा सुमारास ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात पत्नी जागीच ठार तर पती गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

शहरातील समाधान भगवान पुणेकर(४५) व पत्नी मनिषा समाधान पुणेकर(४०) हे दाम्पत्य कामानिमित दुचाकीवर(एम एच २५, जे ६६५१) बाहेरगावी गेले होते. रात्री येण्यासाठी उशीर झाल्याने ते शहरापासून तीन किमी अंतरावर असलेल्या राष्ट्रीय महामार्ग ५२ वर असलेल्या कण्हेरी पाटी येथून महामार्ग ओलांडून शहराकडे येण्यासाठी वाहणारी मोठी वाहने वाहतूक कमी होण्याची वाट पाहत दुचाकी उभा करून उभा होते. यावेळी भरधाव वेगात धाराशिव कडून बीडच्या दिशेने निघेलला ट्रक (एमएच १८, बीए ०६८५) ने जोराची धडक देत मनिषा यांना फरफटत नेले तर बसलेल्या धडकेमुळे पायाला जबर मार लागून समाधान एका बाजूला उडून पडले. यात मनिषा यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताचा आवाज ऐकताच जवळच असलेल्या ढाब्यावर असलेल्या लोकांनी धाव घेऊन जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठवले.धडक दिल्यानंतर ट्रक चालकाने न थांबता तेथून वाहनासह पळ काढला. घटनेची माहिती मिळताच शहरातील अनेक नागरिक घटनास्थळी व रुग्णालयात गेले होते. प्राथमिक उपचार करून समाधान यांना बार्शी येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले होते. तर गुरुवारी सकाळी मयत मनिषा यांच्यावर शहरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत मनिषा या वाशी न्यायालयात कंत्राटी संगणक चालक म्हणून काम करत होत्या. त्यांच्या पश्चात जखमी पती समाधान एक मुलगी,एक मुलगा असा परिवार आहे. पोलिसांकडून शोध सुरू धडक दिल्यानंतर चालकाने ट्रक न थांबवता वाहनासह पळ काढला होता. अंधार असल्याने अथवा कोणी कोणत्या वाहनाने धडक दिली हे पाहिले नव्हते. मात्र घटनेची वेळ आणि पारगाव टोलनाक्यावरून जाणारी वाहने याचा माग वाशी पोलिसांनी काढत. सीसीटीव्ही फुटेज तपासले. ज्यामध्ये समोरील बाजूचे बंपर वाकडे झालेले व तुटलेला ट्रक याच कालावधीत गेल्याचे दिसला. पोलिसांनी सदरील ट्रकचा फोटोमधून नंबर मिळवत शोध सुरू केला आहे.

जाहीरनामा

मा. श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात

विधीज्ञ श्री. शिंद आर. आर.

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३२५/२०२६

आशाबाई वि. निल

मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १) आशाबाई भ्र. जगन्नाथ टुले, वयः ५१ वर्षे, धंदा: घरकाम, रा. तुळजाई नगर, ग्रामसेवक कॉलनी, बालेपीर, नगर रोड, बीड ता. जि. बीड, २) सचिन पि. जगन्नाथ टुले, वय: ३७वर्षे, धंदाः शेती, रा. वरील प्रमणे, ३) नितीन पि. जगन्नाथ टुले, वयः ३४ वर्षे, धंदाः शेती, रा. वरील प्रमाणे, ४) दिपाली जगन्नाथ टुले, वयः ३२वर्षे, धंदाः घरकाम, रा. वरील प्रमाणे ५) रूपाली जगन्नाथ टुले, वयः २८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. वरील प्रमाणे

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे जगन्नाथ एकनाथ टुले, राहणार तुळजाई नगर, ग्रामसेवक कॉलनी, नगर रोड, बालेपीर, बीड ता. जि. बीड हे दिनांक ०८/०१/२०२६ रोजी आरएमडी हार्टकेअर ॲन्ड इन्सिटट्युट पुणे येथे मयत झालेले आहेत.

आहेत. अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले तर अर्जदार क्र. ४ व ५ मयताचे मुली मयत नामे जगन्नाथ एकनाथ टुले, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत जगन्नाथ एकनाथ टुले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०४/०४/२०२६ आहे.

आज दिनांक २७/०२/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित
**क. लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
व. स्तर, बीड

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

## यापूर्वी कोर्टाचा निकाल नव्हता म्हणून आरोप केले-अण्णा हजारे

अहिल्यानगर। प्रतिनिधी

दिल्ली मद्य धोरण प्रकरणात सीबीआयच्या तपासाला मोठा धक्का बसला आहे. दिल्लीच्या राउज एव्हेन्यू कोर्टाने आम आदमी पक्षाचे नेते व दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांच्यासह सर्व २३ आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे. आरोपपत्रात लावलेले आरोप सिद्ध करण्यासाठी ठोस पुरावे नाहीत, असे कोर्टाने म्हटले आहे. यावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पत्रकार परिषदेत बोलताना अण्णा हजारे म्हणाले, आपला देश न्यायव्यवस्थेवर चालतो. आपल्या देशात न्यायव्यवस्था सर्वोच्च स्थानावर आहे. आपला देश खूप मोठा आहे, पक्ष-पार्टी, जाती-पाती, धर्म, इतका मोठा आपला देश आहे, पण सगळे सुरळीत चालते, याचे कारण न्यायव्यवस्था. न्यायव्यवस्थेच्या आधारवर आपल्याला चालावेच लागणार आहे. जर न्यायव्यवस्था नसती तर हे गुंड, लफंगे, दंगली झाल्या असत्या. परंतु, न्यायव्यवस्था आहे म्हणून सगळे योग्य सुरू असल्याचे हजारे यांनी म्हटले.

पुढे बोलताना अण्णा हजारे म्हणाले, मी यापूर्वी अरविंद केजरीवालच्या



बाबतीत जे काही म्हटले असेल तेव्हा न्यायव्यवस्थेचा निर्णय नव्हता. आता न्यायव्यवस्थेने निर्णय दिला आहे की त्यांचा काही दोष नाहीये, तर आपल्याला मान्य करावे लागेल. तेव्हा न्यायव्यवस्थेचा निर्णय नव्हता म्हणून मोघम, हवेत बोलले जात होते. जर तेव्हा न्यायव्यवस्थेचा निर्णय असला असता तर मी असे काही म्हटलेच नसते. अण्णा हजारे म्हणाले, अरविंद केजरीवाल, मनीष सिसोडिया हे माझे जुने कार्यकर्ते आहेत. मी त्यांना एकच सल्ला देईल की, समाज आणि देशाच्या हितासाठी जे काही करता येईल ते करत रहा. स्वतःच्या आणि पक्षाबद्दल विचार नका करू. देशाचा विचार करा. देशाला पुढे न्यायचे आहे. अनेकांच्या बलिदानाने या देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे, हे विसरून चालणार नाही. केजरीवाल म्हणाले- मोदी-शहा यांनी आमच्या विरोधात कट रचला:न्यायालयाच्या निर्णयानंतर मनावरचे मोठे ओझे उतरले; जनतेला माहिती आहे की आम्ही प्रामाणिक दिल्ली दारू धोरणाशी संबंधित सीबीआय प्रकरणात निर्दोष मुक्तता झाल्यानंतर माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे (आप) संयोजक अरविंद केजरीवाल यांनी पक्ष कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. माजी मुख्यमंत्री म्हणाले, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी आमच्याविरुद्ध कट रचला. जेव्हा ते 'आप'ला हरवू शकले नाहीत, तेव्हा ते 'आप'ला नष्ट करण्यासाठी निघाले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ | ६

# जिल्ह्यात पोलीस पाटील भरतीमध्ये निवडक उमेदवारावर अंधारातून जोर

## मुलाखतीच्या नावाखाली गुण वाढविण्याचे षडयंत्र सरवदे यांचा आरोप

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यात सुरू असलेल्या पोलीस पाटील भरती प्रक्रियेमध्ये संभाव्य अनियमितता, पात्रता निकषांचे उल्लंघन आणि पारदर्शकतेचा अभाव असल्याचा गंभीर आरोप करत जिल्हाध्यक्ष प्रतिक उर्फ अजय सरवदे वंचित बहुजन आघाडी, बीड पश्चिम यांनी मा. जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे लेखी तक्रार सादर केली आहे.**

सदर भरती प्रक्रिया महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील अधिनियम व संबंधित शासन निर्णयानुसार पारदर्शक व गुणवत्ता–आधारित पद्धतीने राबविणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात काही गंभीर त्रुटी आढळत असल्याची माहिती विश्वसनीय स्त्रोतांकडून मिळाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

उपविभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात काही अधिकारी/कर्मचारी यांच्या माध्यमातून उमेदवारांकडून आर्थिक व्यवहार सुरू असल्याची चर्चा लाभार्थ्यांकडून ऐकण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच लेखी परीक्षेत कमी गुण मिळालेल्या उमेदवारांना मुलाखतीत जाणीवपूर्वक जास्त गुण देऊन निवडीस प्राधान्य देण्याचा प्रयत्न होत असल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे. काही प्रस्थापित राजकीय पक्षांशी संबंधित व्यक्तींना लाभ मिळावा यासाठी दबावतंत्र वापरले जात असल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही निवेदनात म्हटले आहे. पोलीस पाटील पदासाठी उमेदवाराचा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसणे, ग्रामपंचायत सदस्य नसणे, पूर्णवेळ नोकरीत नसणे इत्यादी अटी बंधनकारक आहेत. तसेच ५०० च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. मात्र, बीड तालुक्यातील एका ग्रामपंचायत सदस्याने परीक्षा दिल्याचे निदर्शनास आल्याचा आरोप करण्यात आला असून, त्याबाबत सखोल पडताळणी न झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. प्रतिज्ञापत्रे व कागदपत्रांची काटेकोर छाननी न झाल्यास संपूर्ण प्रक्रिया संशयास्पद ठरू शकते, असा इशारा देण्यात आला आहे.

संपूर्ण भरती प्रक्रियेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, लेखी परीक्षा व मुलाखतीचे गुण (मेरिट लिस्टसह) सार्वजनिक करावेत, सर्व उमेदवारांची पात्रता व प्रतिज्ञापत्रांची पुनर्पडताळणी करावी, खोटे प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, आर्थिक व्यवहारांच्या आरोपांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करावी. पोलीस पाटील पद हे ग्राम प्रशासनाच्या कायदा व सुव्यवस्थेशी थेट संबंधित असल्याने भरती प्रक्रियेतील पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अन्यथा प्रशासनावरील जनतेचा विश्वास कमी होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

### तक्रारी वाढत आहेत, वेळेत आवाज उठवा!

बीड जिल्ह्यात यापूर्वी अंगणवाडी मदतनीस भरती प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमिततेचे आरोप झाले होते. आता ग्राम पोलीस पाटील भरती प्रक्रियेबाबतही हळूहळू तक्रारी पुढे येत आहेत. वेळ निघून गेल्यानंतर तक्रारी करत बसण्यापेक्षा अर्जदारांनी मुदतीतच तक्रार दाखल करावी, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीने केले आहे. ज्या ठिकाणी अन्याय होईल, त्या अर्जदाराने थेट वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. आम्ही त्यांच्या मदतीसाठी सदैव उपलब्ध आहोत, असे जिल्हाध्यक्ष प्रतिक उर्फ अजय सरवदे यांनी स्पष्ट केले आहे.

### लाच देणे व घेणे दोन्ही गुन्हा, एसीबीने जागे व्हावे!

लाच देणे व लाच घेणे हे दोन्ही कायद्यानुसार गंभीर गुन्हे आहेत. याच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागची स्थापना करण्यात आलेली आहे. परंतु बीड जिल्ह्यामध्ये सध्या सुरू असलेल्या पोलीस पाटील भरती प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अधिक सतर्क राहणे अत्यावश्यक आहे. काही ठिकाणी उमेदवारांकडून लाच मागितली जात असल्याच्या चर्चा व तक्रारी समोर येत आहेत. अशा परिस्थितीत संबंधित विभागाने झोपेचे सोंग न घेता तात्काळ गुप्त पडताळणी, सापळा कारवाई (ट्रॅप), हेल्पलाईन जाहीर करणे व जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक आहे. पोलीस पाटील भरती ही ग्रामीण प्रशासनातील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. जर या भरतीमध्ये पैशांच्या जोरावर नियुक्त्या झाल्या, तर शासन यंत्रणेवरील लोकांचा विश्वास डळमळीत होईल.

# न.प.च्या अर्थसंकल्पीय बैठकीत बीडकरांच्या प्रश्नांवर डॉ.सारिका क्षीरसागरांनी वेधले लक्ष

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेची अर्थसंकल्पीय बैठक शुक्रवारी (दि.२७) पार पडली. या बैठकीत भाजपच्या गटनेत्या नगरसेविका डॉ.सारिका योगेश क्षीरसागर यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भात विविध महत्त्वाचे मुद्दे व प्रस्ताव मांडले. बैठकीस समिती अध्यक्ष, नगरसेवक, नगरपरिषद प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



अर्थसंकल्पीय बैठकीत डॉ.सारिका क्षीरसागर म्हणाल्या, माजी सैनिकांना घरपट्टी व नळपट्टी नियमानुसार माफ करावी. वाढत्या शहराचा विचार करता पश्चिम बीड शहरासाठी नवीन अग्निशमन केंद्र प्रस्तावित करावे. नवीन भाजी मंडई, ◀◀ पान ३ वर

### स्व.अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण

बीड नगरपरिषदेत अर्थसंकल्पीय बैठक सुरु होण्यापूर्वीच राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ही बैठक पार पडल्यानंतर सर्वसाधारण सभा सुरू झाली. वेळेअभावी सभा तहकुब करण्यात आली असून आज पूर्ण होणार आहे. या सर्वसाधारण सभेत डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी शहरवासीयांच्या प्रश्नावर आवाज उठविला आहे.

# कामे न करताच एक कोटींची बिले उचलली!

## बीडच्या सत्ताधारी पदाधिकाऱ्याचा अन अधिकाऱ्यांचा प्रताप!

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेचा बांधकामं विभाग म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण बनला आहे. कोणीही कोणतीही वर्क ऑर्डर काढायची, अधिकारी मॅनेज करायचे आणि कोट्यावधी रुपये उचलायचे. असाच एक प्रकार परळीत उघडकीस आला आहे. नेत्याच्या मागेपुढे करत त्यांची बीडला आल्यावर बडदास्त ठेवणाऱ्या सत्ताधारी पक्षातील बीडच्या एका मोठ्या कार्यकर्त्याने तब्बल एक कोटी रुपयांची बोगस कामे केली. यातील ८६ लाख रुपयांची वसुली होणार असल्याने गुत्तेदारासह बीडचा तो मोठा कार्यकर्ता हैराण झाला आहे.

परळीतील मोहा या प्राथमिक आरोग्य केंद्राला कुरण बनवून अधिकारी आणि कंत्राटदारांनी तब्बल ८६ लाख ५७हजार ९३३ रूपयांचा निधी घश्यात घातला आहे. याप्रकरणी चौकशी समितीने आपला अहवाल सादर केला आहे. त्यानुसार याप्रकरणातील घोटाळेबाज तीन अधिकाऱ्यांसह दोषी घोटाळेबाजांवर कारवाई करण्याचे आदेश सीईओ जितीन रहमान यांनी बांधकाम दोनच्या कार्यकारी अभियंत्यांना दिले आहेत. यासंदर्भात त्यांनी एक पत्रही काढले आहे. त्यामुळेच घोटाळेबाजांचे धाबे दणाणून गेले.

मोहा प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी निवासस्थाने, आरोग्य केंद्राची दुरुस्ती यासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. या ठिकाणी केवळ बारा तेरा लाखात थातूर मातुर दुरुस्ती करून गुत्तेदारांनी ८६ लाख रुपये घशात घातले. यामध्ये जिल्हा परिषद मधील शाखा अभियंता यांच्या मुलाच्या नावावर काही कामे करण्यात आल्याचे दाखवण्यात आले. मुलाच्या नावावर कामे असल्याने या शाखा अभियंत्याने बोगस कामांना मंजुरी दिली.

मोहा येथे काम करण्यासाठी शितल रामराव तांदळे , गजानम म.स.सं.म. काकहिरा (ता. पाटोदा), शशिकांत चंद्रकांत सांगळे (रा. हिलर पाटला. केज), संत शिरोमणी भगवान बाबा म.स.ना.म. (घोगस पारयाव ता. शिरूर), अजय महादेव ढाकणे (रा. संभाजीनगर बीड), विशाल रविंद्र भेटूळे (दोन कामे रा. वरवंटी ता. बीड) आणि शिवशंकर गोरख मिदे (रा. चिखली ता. पाटोदा) या एजन्सी होत्या. त्यांनी कामात कसूर केल्याचा आणि बोगस काम करून बिल उचलल्याचा ठपका समितीने ठेवला आहे.या कामात ज्यांनी ज्यांनी घोटाळे केले आहेत त्यांच्याबर आता ◀◀ पान ३ वर

### ही कामे झाली बोगस!

**मोहा येथील प्रा.आ. केंद्राच्या मुख्य इमारतीची दुरुस्ती, इमारतीमधील फर्निचर, वैद्यकिय अधिकारी निवास स्थान दुरुस्ती करणे, आरोग्य सेविका निवासस्थान दुरुस्ती करणे, लेडी हेल्थ व्हिजीटर निवास स्थान दुरुस्ती करणे, शवविच्छदेन गृह बांधकाम करणे, स्वच्छतासह दुरुस्ती व संपुर्ण नळ योजना करणे, परिसर उदयान सुशोभिकरण करणे, परिसरामध्ये वाहनशेड करणे, वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी निवासस्थान सिमेंट कॉंक्रिट बंदिस्त नाली बांधकाम करणे, कार्टर सिमेंट कॉंक्रिट बंदिस्त नाली यांधकाम करणे, कार्टर परिसरामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे, सरंक्षण मित बांधकाम करणे, या कामात तब्बल ८६५७९३३ रूपयांची तफावत आढळून आली .**

### भाषा व्यक्तीच्या प्रदेशाची ओळख दर्शविते : प्राचार्य डॉ. सानप

संभाजी नगर । प्रतिनिधी



भाषा शिवाय संवाद आणि संवादाशिवाय भाषाला पूर्णत्व प्राप्त होत नाही. भाषा आणि संवाद एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भाषा संवादाची जननी आहे. भाषा व्यक्तीच्या प्रदेशाची ओळख दर्शविते असे मत प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी व्यक्त केले. छत्रपती ◀◀ पान ३ वर

# वाळू माफियांना अंभोरा पोलिसांचा दणका, ३८ लाखांचा मुद्देमाल जप्त

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत पोलिसांनी वाळू तस्करांविरोधात निर्णायक कारवाई करत दोन हायवा वाहनांसह तब्बल ३८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ठोंबळसांगवी नदीपात्रातून अवैधरीत्या वाळू उपसा करून ती अहिल्यानगर येथे विक्रीसाठी नेली जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचला.



**अशी केली कारवाई..**

सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांच्या पथकाला नदीपात्रात रात्रीच्या अंधारात वाळू उपसा सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.बुधवारी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी ठोंबळसांगवी नदीपात्रात अचानक धाड टाकली.धाडीत वाळूने भरलेले दोन हायवा वाहनांसह चालकांना ताब्यात घेण्यात आले.प्राथमिक चौकशीत कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याचे स्पष्ट झाले.

**दोन जणांविरुद्ध गुन्हा**

या प्रकरणी पोलीस अंमलदार सतीश पैठणे यांच्या फिर्यादीवरून अंभोरा पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या वाहनांची व वाळूची एकूण किंमत ३८ लाख २० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**३८ लाख २० हजारांचा मुद्देमाल ताब्यात..**

◀◀ पान ३ वर

# शेकटा येथे तुकाराम महाराज बीज सप्ताह निमित्त ह.भ.प.परमेश्वर महाराज वाघमोडे यांचे कीर्तन

मादळमोही । प्रतिनिधी

श्री संत तुकाराम महाराज सददेह वैकुंठ गमन सोहळा व संत कुलभूषण महात्मा नारायण महाराज पुण्यतिथी निमित्ताने अखंड हरिणाम सप्ताह वर्ष ३७६वे. शेकटा ता, गेवराई येथे किर्तनाच्या माध्यामातून संपन्न झाली,



या सप्ताह पहिली कीर्तन सेवा पहिला पुष्पचक्र गुंफताना ह. भ. प परमेश्वर महाराज वाघमोडे यांनी या अंभागातुन आपले परखड विचार मांडले, किर्तन रुपे सेवेसाठी महाराजांनी

सारासार विचार करा उठाउठी
नाम धरा कंठी विठोबाचे
तयाच्या चिंतने निरसेल संकट
तराल दुर्घट भावसिंधू
जन्मोनिया कुळी वाचे
स्म रे राम
धरी हाची नेम अहनिर्शी
तुका म्हणे कोटी कुळे
ति पुनीत
भावे गाता गीत
विठोबाचे!!

या अभंग घेऊन मार्गदर्शन केले.

आज काल आई बाप लोक सांभाळत नाही आणि कुत्र्याला सांभाळत...

अशी लोक जीवनात पुढे जाऊ शकत नाही.

आई बापाची सेवा करा..

या कार्यक्रमाला गणेश महाराज कदम, मृदंगाचार्य, संतोष महाराज महरगुडे, बाळू महाराज महरगुडे गायनचार्य,संतोष भारती, पत्रकार, बाबासाहेब, डोईफोडे, तुकाराम महानोर, आबासाहेब शेंबडे, गणेश शेंबडे, सुखदेव, मुरली महाराज,भाऊ कर्डीले चकलांबा कर, आदी गावकरी उपस्थित होते.ह, भ, प, परमेश्वर वाघमोडे यांची खास विनोदी शैली वाघमोडे महाराजानी अनेक ज्वलंत प्रमाणे देवुन आपल्या विनोदी शैलीतून अनेक श्रोत्यांना हासवले, मुलांना मोबाईल पासून दुर ठेवा, स्पर्धेतेचा जगतात स्वावलंबी मनवा, जाती वादाला धारा देवु नकी, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य अठरा पगड जाती धर्मांना सोबत घेवून गेले, त्यांचे विचार तळागाळातील सर्वसामान्य घटका पर्यंत पोहचा असे ही त्यांनी सांगितले.

# दलित महिलेचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी आरोपीस सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा

बीड । प्रतिनिधी

दिनांक ०१.१२.२०२० रोजी आरोपी याने महिलेचा वाईट हेतुने हात धरून व जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी शिरूर तालुक्यातील रा. पाडळी या गावचा रहिवासी असलेला आरोपी नामे. दत्ता भिमराव दुधाळ यास मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश –१ मा. व्ही.एच. पाटवदकर साहेब यांनी दोषी ठरवून ६ महिने करावास व १,०००/ रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना कारावास एवढयाा दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल ॲड. अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले.

दिनांक ०१.१२.२०२० रोजी दुपारी अंदाजे बारा वाजण्योच सुमारास मी पिण्याने पाणी पाडळी येथील बौध्दविहारा समोरील सरकारी बोर वरून पाणी भरून घरी जात असतांना आरोपी नामे. दत्ता भिमराव दुधाळ हा माठीमागुन मोटारसायकल वर येवून मला म्हणाला की, ऐ राणी जरा बाजुला सरक तेव्हा मी त्याला म्हणाले की, जरा निट बोलता येतः नाही का तेव्हा तो म्हणाला की, ये तुझे सारख्या भेडगीन माहारीनला काय निट बोलायचे, चल निह निघ नाहीतर ईथेच तुझा कार्यक्रम करीन, त्यानंतर आरोपी याने गाडीवरून खाली उतरून वाईट हेतुन हात धरून मला ओढाओढी करू लागला व मला म्हणाला की, तुझा कंड कसा जिरवायचा मला माहित आहे. त्यानंतर आरोपी याने माझे केस व साडीला धरून ओढाओढ सुरू केली व खाली पाडुन छातीवर डोक्यात बुक्याने हाणमार करून व जीवे मारण्याची धमकी दिली.

पिडीतेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन शिरूर कासार येथे आरोपी विरूध्द कलम ३५४–अ, ३२३,५०४ भादवी आणि कलम ३(१) (आर), (एस), ३(१) (डब्यू) (आय) अनुसुचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तात्कालील उपविभागीय अधिकारी आष्टी श्री. विजय लगारे यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणी सुनावर्णी जिल्हा व सत्र न्यायाधीश १ मा. व्ही.एच. पाटवदकर साहेब बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ०८ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणत पिडीता, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी यांचा पुरावा व सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश १ मा. व्ही.एच. पाटवदकर साहेब यांनी आरोपी यास कलम ३५४–अ, ३२३,५०४ भादवी आणि कलम ३(१) (ि) (ि), ३(१) (ु) (ळ) अनुसुचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ करीता ६ महिने साधा करावास व १,०००/ रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास एवढ्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले. उपविभागीय अधिकारी आष्टी श्री. विजय लगारे व पैरवी अधिकारी,गोविंद सानप पी. एस.आय. कोर्ट ड्युटी अंमलदार श्री. पोपट गव्हाणे ए एस आय यांनी सहकार्य केले.

# अवकाळी पाऊस व गारपीटीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या–राणा चव्हाण

### अ.भा.मराठा महासंघाचे अपर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यात सोमवारी झालेल्या आवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतातील काढणीस आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानीचे पंचनामे करून शासनाने शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी व तालुक्यातील शेतकऱ्यांनी अपर जिल्हाधिकारी यांना निवेदनातून केली आहे.



अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष आ.नरेंद्र पाटील व विभागीय अध्यक्ष गोपाळ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंबाजोगाई तालुक्यातील मुडेगाव, सुगाव, नांदगाव, अपेगाव, धानोरा (खूर्द), सोमनाथ बोरगाव, हिवरा ◀◀ पान ३ वर

# तुलसी समूहातर्फे ८ मार्च रोजी भव्य महिला मॅरेथॉनचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवार, दि. ८ मार्च रोजी भव्य 'महिला मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ६ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे मान्यवरांच्या हस्ते मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवण्यात येईल. ७ किलोमीटर अंतराच्या या स्पर्धेला याच क्रीडांगणावरून प्रारंभ होऊन नगर रोडमार्गे पुन्हा क्रीडांगणावरच समारोप होणार आहे.

स्पर्धा दोन वयोगटांत विभागण्यात आली असून १० ते १८ वर्षे तसेच १८ वर्षांवरील महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांना अनुक्रमे रुपये १५,०००, १०,००० व ७,००० अशी पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सर्व सहभागी स्पर्धकांना टी–शर्ट, नाश्ता व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लहान गटासाठी ५० रुपये तर मोठ्या गटासाठी २०० रुपये नोंदणी शुल्क निश्चित करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनी तसेच पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या इच्छुक मुली व महिलांनी शुक्रवार, दि. ६ मार्चपर्यंत आपली नोंदणी करून सहभाग निश्चित करावा. अधिक माहितीसाठी ८७८८५३७३४४ किंवा ८२७५५४२०८२ या क्रमांकावर संपर्क साधावा व मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**शेतकऱ्याना/बेरोजगारानो जोडधंद्यामधून लखोपती व्हा**

विविध महामंडळाचे/जिल्हा उद्योग केंद्र/ पशुसंवर्धन/ अण्णासाहेब पाटील इत्यादी शासनाचे शेळीपालन/पशुपालन/ दुग्ध व्यवसाय/ कोंबडी पालन/ वराह पालन इत्यादी जोड धंद्यामधून मार्गदर्शन घ्या.

प्रशिक्षण प्रमाणपत्रासाठी फोटो आधारकार्ड, रु.७५०/– आवश्यक.
दिनांक : १ मार्च २०२६ वेळ : सकाळी ११ते २ वार : रविवार ठिकाण : हॉटेल अतिथी, बीड



* संपर्क *
डॉ.वसंत र.मुंडे
बी.व्ही.एससी.अँड ए.एच.
मो.नं.९४२२५६५३६५

प्रमाणपत्रासाठी ७५० रु. फीस राहील.
आधारकार्ड, २ फोटो आवश्यक
दि.१ मार्च २०२६
वेळ : सकाळी ११ते २

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ । पान ७

# सराईत गुन्हेगारांना पुणे पोलिसांचा मोठा दणका! एकाचवेळी ९ गुंडांना दोन वर्षांसाठी पुणे जिल्ह्यातून केलं तडीपार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे पोलिसांनी सराईत गुन्हेगारांना मोठा दणका दिला आहे. स्वतःला दादा समजत शहरात दहशत माजवणाऱ्या रेकॉर्डवरील गुंडांना पुणे पोलिसांनी तडीपार केलं आहे. एकाचवेळी शहरातील ९ गुंड पुणे शहर आणि पुणे जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहेत. शहरातील बिबवेवाडी, आंबेगाव, मार्केटयार्ड आणि शहरातील इतर परिसरात दहशत माजवणाऱ्या ९ गुंडाना दोन वर्षांसाठी शहर, तसेच जिल्ह्यातून तडीपार करत, पुणे पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.

शहरात वाढती गुन्हेगारी आणि टोळीयुद्धाचा बिमोड करण्यासाठी पुणे पोलिसांकडून कडक पावले उचलायला सुरुवात केली आहे. तडीपार करण्यात आलेल्या या रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर गुन्हेगारी टोळ्या, तसेच सराइतांच्या दहशतीमुळे नागरिक भयभीत झाले आहेत, तसेच कायदा आणि सुव्यवस्थेला बाधा निर्माण झाल्याने नऊ जणांना



तडीपार करण्यात आले. आरोपींविरुद्ध खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, बेकायदा शस्त्र बाळगणे, गंभीर दुखापत करणे, धमकी देणे, मारहाण करणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. जालिंदर मसा मोरे (वय ४८ रा. अप्पर इंदिरानगर), अण्णा ऊर्फ गणराज सुनिल ठाकर (वय २६ रा. अप्पर बिबवेवाडी), ओंकार लक्ष्मण सणस (वय २३ रा. बिबवेवाडी), राजु महादेव डेंगळे (वय २२ रा. सुखसागर नगर), आकाश गुलाबराव कांबळे (वय २१ रा.), कृष्णा बबन लोखंडे (वय २४ रा.), आर्यन बापु बेलदरे (वय २४ रा. आंबेगाव बुद्रुक), सोमगौडा गुरन्ना चौधरी (वय ३३, रा. मार्केटयार्ड), साहिल भिमा अष्टगे (वय २० रा. मार्केटयार्ड) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत. दरम्यान, सध्या राज्याच्या काही भागात सातत्याने गुन्हेगारीच्या घटना घडत आहेत. अशा घटना घडून नयेत म्हणून पोलीस प्रशासन सतर्क आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसात पुणे जिल्ह्यात देखील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचं चित्र आपल्याला पाहायला मिळत आहे. या गुन्हेगारीच्या मुद्याची गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. वाढत्या गुन्हेगारीच्या मुद्यावरुन सत्ताधारी आणि विरोधक ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप देखील करत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, पुणे शहरातील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी प्रशासन सतर्क झालं आहे. सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यात आलं आहे.

# लग्नानंतर अवघ्या तीन महिन्यातच छळ अन् त्रास; नवविवाहितेने इमारतीवरून उडी घेऊन संपवलं जीवन,

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. सासरच्या छळाला कंटाळून नवविवाहीत लग्नानंतर अवघ्या तीन महिन्यात आत्महत्या केली असल्याचं उघड झालं आहे. या नवविवाहितेने इमारतीवरून उडी मारून जीवन संपवलं असल्याचं उघड झालं आहे. याप्रकरणी मृत महिलेच्या सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस या घटनेचा सविस्तर तपास केला जात आहे. दरम्यान या घटनेने परिसरात संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना पुण्यातील बाणेर परिसरात घडली आहे. मृत महिलेचं नाव गंगा तेजस बेंबळकर (वय २७) असे आहे. तर तिच्या पतीचे नाव तेजस शिवा बेंबळकर असे आहे.




तेजस याने अमेरिकेतून उच्चशिक्षण घेतले आहे. तेजस आणि गंगा यांचा विवाह ३ महिन्यांपूर्वी झाला. मात्र लग्नानंतर गंगाला सासरच्या मंडळींकडून छळाला समोर जावं लागलं. या छळाला कंटाळून गंगाने अवघ्या तीन महिन्यातच आपलं जीवन संपवल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

सासरच्या छळाला कंटाळून गंगा या नवविवाहितेने राहत्या इमारतीतून उडी मारून आत्महत्या केल्याचा आरोप गंगाच्या माहेरच्या मंडळींनी केला आहे. याप्रकरणी मृत पावलेल्या महिलेच्या वडिलांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून,नवरा, सासू, नणंद आणि सासरे यांच्या विरोधात पुण्यातील बाणेर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलिसांनी गंगाच्या वडिलांच्या फिर्यादीवरून घटनास्थळी पंचनामा केला. त्यांना घटनास्थळी सुसाईड नोट सापडली आहे. या सुसाईड नोटमध्ये महिलेने मृत्यूला स्वतः जबाबदार असल्याचे लिहिले मात्र महिलेच्या कुटुंबियांच्या आरोपांवरून पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

# रक्तदान सोहळा आणि वृक्ष पुनर्रोपण; आर एम डी फाउंडेशनचा समाजसेवेचा अनोखा संगम

पुणे । प्रतिनिधी

शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांत गेली चार दशके कार्यरत असलेल्या आर एम डी फाउंडेशनने आता 'ट्री ट्रान्सप्लान्टेशन' अर्थात वृक्ष पुनर्रोपण उपक्रमाद्वारे पर्यावरण रक्षणातही आघाडी घेतली आहे. रक्तदान आणि वृक्ष संवर्धन या दोन्ही माध्यमांतून जीवन वाचवण्याची आणि भविष्यासाठी शाश्वत पर्यावरण निर्माण करण्याची ही दुहेरी चळवळ पुणेकरांमध्ये मोठा उत्साह निर्माण करत आहे.

पुणे रिंग रोड प्रकल्पांतर्गत तोडल्या जाणाऱ्या शेकडो झाडांना वाचवण्यासाठी फाउंडेशनच्या अध्यक्षा जान्हवी धारीवाल बालन आणि इतर पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. आतापर्यंत २,५०० हून अधिक वृक्षांचे यशस्वी पुनर्रोपण करण्यात



आले असून त्यात तब्बल ८९ टक्के झाडे जगली आहेत. ही केवळ संख्यात्मक कामगिरी नसून पर्यावरणीय जबाबदारी आणि शाश्वत विकासाप्रती असलेल्या बांधिलकीचे ते प्रत्यक्ष प्रतीक आहे. दरवर्षी १ मार्च रोजी श्री रसिकलाल मा. धारीवाल यांच्या जन्मदिनानिमित्त आर एम डी फाउंडेशनतर्फे 'रक्तदान सोहळा' आयोजित केला जातो. पुण्यातील विविध रक्तदान केंद्रांवर एकाच दिवशी २५,००० हून अधिक ब्लड बॅग्ज संकलित करण्याचा उल्लेखनीय विक्रम फाउंडेशनने यापूर्वी प्रस्थापित केला आहे. मानवसेवेची ही परंपरा आजही तितक्याच उत्साहाने आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेने सुरू आहे. दिनांक १ मार्च २०२६, रविवारी हा रक्तदान सोहळा पुन्हा एकदा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. जास्तीत जास्त पुणेकरांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे. रक्तदान आणि वृक्ष पुनर्रोपण जीवन संवर्धानची दुहेरी बांधिलकी असल्याचे शोभाताई आर. धारीवाल यांनी म्हंटले आहे.

# पुण्यात आयसीयू बेडसाठी पुढील दहा वर्षांचा रोडमॅप

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात राज्यभरातून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने आयसीयू बेडची कमतरता जाणवत आहे. शहरात येणाऱ्या गंभीर रुग्णांना वेळेत आयसीयू बेड उपलब्ध व्हावेत. यासाठी पुढील दहा वर्षांचा सविस्तर रोडमॅप तयार केला जाणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना दीपक बोर्डीकर-साकोरे यांनी दिली. कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनिल कांबळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर त्या बोलत होत्या.




शहरातील मोठ्या रुग्णालयांमध्ये आयसीयू बेडची कमतरता भासत असल्याने गंभीर रुग्णांना बेड मिळण्यासाठी नातेवाईकांना अनेक रुग्णालयांच्या फेऱ्या माराव्या लागतात. वाढती लोकसंख्या, बाहेरून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या आणि मर्यादित सुविधा यामुळे रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची बाब कांबळे यांनी लक्षवेधीद्वारे मांडली. या परिस्थितीवर शासन कोणती उपाययोजना करणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना राज्यमंत्री बोर्डीकर-साकोरे म्हणाल्या की, पुणे शहरात उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध असल्यामुळे आसपासच्या जिल्ह्यांमधून तसेच राज्यभरातून रुग्ण उपचारासाठी येथे येतात. इंडियन पब्लिक हेल्थच्या निकषांनुसार सुमारे २८०० रुग्णांमागे एक आयसीयू बेड उपलब्ध असणे आवश्यक आहे. पुण्यात शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये मिळून सुमारे २४०० आयसीयू बेड उपलब्ध असून ही संख्या निकषांपेक्षा जास्त आहे. तरीही भविष्यातील गरज लक्षात घेऊन पुढील दहा वर्षांसाठी आयसीयू सुविधांचा सविस्तर आराखडा तयार करण्याचे काम शासनाकडून सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या रोडमॅपनुसार नवीन आयसीयू सुविधा उभारणे, विद्यमान क्षमतेत वाढ करणे, तसेच गंभीर रुग्णांसाठी उपचार व्यवस्था अधिक सक्षम करणे यावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# सिंहगड किल्ल्यावर आढळला बेपत्ता मजुराचा मृतदेह

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील ऐतिहासिक सिंहगड किल्ल्यावर बेपत्ता झालेल्या मजुराचा मृतदेह गुरुवारी सायंकाळच्या सुमारास कल्याण दरवाजाच्या दरीत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. दशरथ शंकर धोत्रे (मूळ रा. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे मृत मजुराचे नाव आहे.

दशरथ धोत्रे हे चार दिवसांपूर्वी सिंहगड किल्ल्यावर कामासाठी आले होते. किल्ल्यावरील नरवीर तानाजी मालुसरे समाधी परिसरात पुरातत्व विभागाच्या कामासाठी नियुक्त ठेकेदाराकडे ते इतर चार-पाच मजुरांसमवेत काम करत होते. सर्वजण किल्ल्यावरच वास्तव्यास होते. बुधवारी मध्यरात्रीपासून धोत्रे हे



बेपत्ता होते. त्यांच्या सहकाऱ्यांना ते गावाकडे निघून गेले असावेत, अशी शंका होती. दिवसभर त्यांच्याशी संपर्कही होऊ शकला नाही. दरम्यान, सायंकाळच्या सुमारास किल्ल्यावरील कल्याण दरवाजा परिसरात पर्यटकांना दरीत मृतदेह दिसून आला. त्यांनी तत्काळ संबंधितांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच हवेली आपत्ती व्यवस्थापन पथकाचे तानाजी भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत दरीतून मृतदेह बाहेर काढला. त्यानंतर मृतदेह स्थानिक राजगड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. राजगड पोलिसांनी घटनेची नोंद करून पुढील तपास सुरू केला असून मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. घटनेमुळे सिंहगड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## देशात पहिल्यांदाच असा प्रयोग! भीमाशंकरमध्ये 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'ची तयारी

पुणे । प्रतिनिधी

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथील मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे. सुमारे पावणेतीन हजार चौरस फुटांच्या सभामंडपाचे काम केवळ चार महिन्यांत पारंपरिक तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण करण्यात येणार आहे. देशात पहिल्यांदाच अशा स्वरूपाचे जीर्णोद्धाराचे काम पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येत असून, दगडातील या बांधकामाचा गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समाविष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे.


खेड तालुक्यातील भीमाशंकर ज्योतिर्लिंगाच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास राज्य सरकारने यापूर्वीच मान्यता दिली आहे. यासाठी २८८ कोटी १७ लाख रुपयांची मदत राज्य सरकारकडून केली जाणार आहे. केवळ सभामंडपासाठी १० कोटी रुपयांचा खर्च करण्यात येत आहे. कमी वेळेत पारंपरिक साहित्य व तंत्रांचा वापर करून, उत्कृष्ट कारागिरीच्या साहाय्याने पूर्ण झालेला हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर आदर्श ठरणार असून, याची जागतिक पातळीवर नोंद व्हावी, यासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी अर्ज करण्यात येणार आहे. या सभामंडपात एकूण ४८ स्तंभ असून, मध्यभागी घुमट तयार करण्यात येणार आहे. या सभामंडपाचे एकूण क्षेत्र २ हजार ७५० चौरस फूट इतके असेल. यातील स्तंभ दोन ते तीन दगडांमध्ये पूर्ण करण्यात येणार असून, स्तंभांवर कमानी उभारल्या जाणार आहेत. त्याही तीन दगडांमध्येच पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यावर असलेला घुमटदेखील तशाच पद्धतीने उभारला जाणार आहे. हा सभा मंडप तयार करण्यासाठी केवळ चार महिन्यांचा कालावधी लागणार असून, हे काम विक्रमी वेळेत पूर्ण करण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे.

# पुणे स्टेशनवर ४ नवीन लिफ्ट सुरू! आता जिने चढण्याचं टेन्शन मिटलं

पुणे । प्रतिनिधी

प्रवाशांच्या सोयीसाठी पुणे रेल्वे स्थानकावर उभारण्यात आलेल्या चार नवीन लिफ्ट सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग प्रवाशांना फलाटवर ये-जा करणे आता अधिक सोयीचे झाले आहे. मध्य रेल्वे विभागातील पुणे स्टेशन हे महत्त्वाचे रेल्वे स्थानक आहे.

या ठिकाणावरून दररोज २०० हून रेल्वे गाड्या धावतात. तसेच, दैनंदिन दीड लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे स्थानकावर कायम प्रवाशांची वर्दळ असते. आता उन्हाळा सुरू होत असल्याने प्रवाशांच्या गर्दीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. पुणे स्टेशनवरून राज्यातील कोनाकोपऱ्यासह अन्य राज्यांत जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गर्दी असते. या गर्दीत बॅग घेऊन



प्रवाशांना जिन्यानेच चढ-उतार करावा लागत होता. मोठ्या बॅगा, लहान मुले किंवा आरोग्याच्या अडचणी असलेल्या प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत होत्या. अनेक वेळा महिला आणि ज्येष्ठांना जिने चढताना अडचणी येत होत्या. त्यामुळे स्थानकावर लिफ्टची सुविधा असावी, अशी मागणी प्रवाशांसाकडून वारंवार करण्यात येत होती. त्यानुसार पुणे रेल्वे स्थानकावर लिफ्ट बसविण्यास मान्यता देत निधी देण्यात आला. आता या चार नवीन लिफ्ट फलाट क्रमांक १ ते ६ दरम्यान असलेल्या पादचारी पुलांजवळ बसविण्यात आल्या आहेत. आता लिफ्टमुळे काही मिनिटांत सुरक्षितपणे आणि सहजपणे फलाटवर पोहोचणे शक्य झाले आहे. या लिफ्ट अत्याधुनिक तंत्रज्ञानाने बनविले असून त्यामध्ये सुरक्षा यंत्रणा, आपत्कालीन अलार्म आणि सीसीटीव्ही देखरेख व्यवस्था बसविण्यात आली आहे. नियमित देखभाल आणि स्वच्छतेसाठीही विशेष पथक नेमण्यात आले आहे. नवीन लिफ्टमुळे पुणे रेल्वे स्थानकावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

# भाजपचे १४ प्रभाग समित्यांवर वर्चस्व! राष्ट्रवादी-काँग्रेस एकत्र आल्यास एका समितीवर संधी

पुणे । प्रतिनिधी

मिनी महापालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्षेत्रीय कार्यालयांच्या प्रभाग समित्यांचे अध्यक्ष मिनी महापौर म्हणून ओळखले जातात. या १५ प्रभाग समित्यांमधील १४ समित्यांवर भाजपचे अध्यक्ष असणार आहेत. तर केवळ एक प्रभाग समिती काँग्रेसच्या वाट्याला येणार आहे. तर महापालिकेत २७ नगरसेवक निवडून आल्यानंतरही राष्ट्रवादी काँग्रेसला एकही समिती मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

प्रभाग रचनेप्रमाणेच प्रशासनाने केलेली प्रभाग समित्यांची रचनाही भाजपच्या पथ्थ्यावर पडल्याचे चित्र आहे. तर महापालिका हद्दवाढ झाल्याने



क्षेत्रीय कार्यालयांची संख्या वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. तर क्षेत्रीय कार्यालयांची संख्या ही लोकसंख्येनुसार करावी, अशी कायद्यात तरतूद आहे.

त्यानुसार २४ लाख लोकसंख्येसाठी १२ क्षेत्रीय कार्यालये तर त्यानंतरच्या प्रत्येक सहा लाख लोकसंख्येसाठी एक क्षेत्रीय कार्यालय असावे, असा नियम आहे. महापालिकेची लोकसंख्या ही ३६ लाखांपेक्षा अधिक आहे. त्यानुसार १५ क्षेत्रीय कार्यालये तयार करण्यात आली असल्याने क्षेत्रीय कार्यालयांची संख्या कायम राहिली आहे.

तर वाघोली, लोहगाव या गावांचा समावेश नगररोड, येरवडा क्षेत्रीय कार्यालयात, मांजरी भागाचा समावेश हडपसरमध्ये, आंबेगाव पठारचा समावेश धनकवडी, शिवणे, खडकवासला, किरकटवाडी भागाचा समावेश सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात करण्यात आला आहे. पक्षीय बलाबलानुसार, १५ मधील केवळ वानवडी-रामटेकडी या एकाच क्षेत्रीय कार्यालयाची प्रभाग समिती काँग्रेसच्या वाट्याला येत आहे. या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत प्रभाग १८ आणि १९ समावेश असून त्यात, आठ नगरसेवकांमध्ये काँग्रेसचे पाच तर भाजपचे तीन नगरसेवक आहेत. त्यामुळे या ठिकाणी काँग्रेसचा प्रभाग समिती अध्यक्ष होणार आहे. तर ढोले-पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतून प्रभाग सहा वगळण्यात आले असल्याने ढोले पाटील रस्ता प्रभाग समिती काँग्रेसच्या हातून गेली आहे. तर, राष्ट्रवादीलाही त्याचा फटका बसला आहे.

# ९२ हजार अर्ज दाखल, पण पालकांमध्ये चिंतेचं वातावरण; 'या' एका चुकीमुळे अर्ज बाद होऊ शकतो

पुणे । प्रतिनिधी

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागावरील प्रवेशासाठी आतापर्यंत ९२ हजार १५६ बालकांचे अर्ज त्यांच्या पालकांकडून ऑनलाइन दाखल झाले आहेत. खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये वंचित व दुर्बल घटकातील बालकांना मोफत प्रवेश व शिक्षण देण्यात येते. संबंधित बालकांच्या शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम शासनाकडून संबंधित शाळांना दिली जाते. मात्र, ती वेळेवर मिळत नसल्याने शाळांकडून सतत नाराजी व्यक्त होते.




त्यात आता बालकांना निवासस्थानापासून प्रवेशासाठी १ कि.मी.पर्यंतच्या शाळा उपलब्ध होणार आहेत. याबाबतही पालकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. पालकांनी अर्ज भरताना आपल्या राहत्या निवासाचा पूर्ण पत्ता आणि गुगल लोकेशन पुन्हा पुन्हा तपासून पाहावे. पूर्ण अर्ज बरोबर असल्याची खात्री झाल्याशिवाय अर्ज सबमिट करू नये. अर्ज भरल्यावर पालकांनी अर्ज क्रमांक, अर्जात लिहिलेला मोबाइल नंबर आणि अर्जाची प्रत स्वतः जवळ लॉटरी प्रक्रिया होईपर्यंत जपून ठेवावी लागणार आहे.

आरटीई प्रवेशासाठी राज्यातील ८ हजार ६५१ शाळांनी नोंदणी केली असून, त्यात १ लाख १२ हजार ७७२ प्रवेशाच्या जागा उपलब्ध झालेल्या आहेत. यासाठी ९२ हजार १५६ अर्ज दाखल झाले आहेत. पुणे जिल्ह्यातील ९०५ शाळांमध्ये १७ हजार ५०९ प्रवेशाच्या जागा उपलब्ध झाल्या आहेत. त्यासाठी १७ हजार ६७१ प्रवेश अर्ज दाखल झाले आहेत. पालकांना आपल्या बालकांचे अर्ज दाखल करण्यासाठी १० मार्चपर्यंत मुदत देण्यात आलेली आहे.